सत्यमेव जयते

# श्वेतपत्रिका

(मसुदा)

महाराष्ट्र राज्याच्या पुढील १५-२० वर्षांच्या कालखंडात व नव्या
चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या (१९६९-१९७४) विशेष संदर्भात
हाती घ्यावयाच्या संकल्पित शैक्षणिक पुनर्रचनेचा आराखडा

महाराष्ट्र शासन
मुंबई
१९६८

महाराष्ट्रातील

[illegible]

महाराष्ट्र विधानसभेला सादर करते वेळी

श्री. मधुकरराव चौधरी

शिक्षण व वन मंत्री, महाराष्ट्र राज्य

यांनी केलेले

# निवेदन

दिनांक ८ एप्रिल १९६८

अध्यक्ष महाराज,

आपल्या राज्यातील शैक्षणिक पुनर्रचनेसाठी तयार करण्यात आलेल्या श्वेतपत्रिकेच्या मसुद्या-संबंधी निवेदन करण्यास मी उभा आहे. ह्या निवेदनानंतर हा "श्वेतपत्रिकेचा मसुदा" मी सदनाला माहितीसाठी सादर करणार आहे. कारण त्यावर सार्वत्रिक चर्चा झाल्यानंतर व लोकमत प्रकट झाल्यानंतर विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात दोन्ही सभागृहांसमोर ठराव मांडून श्वेतपत्रिका सादर करावी असा शासनाचा मानस आहे. सभागृहातील व सभागृहाबाहेरील चर्चेचा आशय लक्षात घेऊन या धोरणविषयक निवेदनाला शासन निर्णायक स्वरूप देऊ शकेल व त्या आधारे येत्या १५ ते २० वर्षांतील शैक्षणिक विकासाचे दर्शन घडविणारी योजना (Perspective Plan) व चतुर्थ पंचवार्षिक योजना साकार होईल. तसेच ह्या शैक्षणिक पुनर्रचनेच्या संकल्पित कार्यक्रमाला कायदेशीर स्वरूप देऊन योजनांची अंमलबजावणी सुकर व्हावी या उद्देशाने एक विधेयक सभागृहाला सादर करण्यात येईल. १९६८–६९ या वर्षभरात सर्व प्रकारे पूर्वतयारी करून १९६९–७० पासून महाराष्ट्रात शैक्षणिक परिवर्तनाच्या ह्या नवीन पर्वास निर्धाराने प्रारंभ करता येईल. १९६९–७० ह्या गांधी जन्मशताब्दी वर्षातच ह्या कार्याच्या दिशेने पाऊले पडावीत हे एक प्रसादचिन्हच म्हटले पाहिजे.

अध्यक्ष महाराज, श्वेतपत्रिकेसंबंधीच्या माझ्या ह्या निवेदनात पुढील तीन प्रमुख मुद्द्यांचे विवेचन मी करूं इच्छितो :—

(अ) शैक्षणिक पुनर्रचनेची गरज व उद्दिष्टे ;

(ब) पुनर्रचनेसंबंधीचे धोरण व कार्यक्रम ; आणि

(क) अंमलबजावणीची पद्धती.

ह्या तीन मुद्द्यांपुरतेच निवेदन करावयाचे ठरविले तरी मला जरा विस्ताराने बोलावे लागेल. परंतु विषयाचे गांभीर्य व महत्त्व लक्षात घेऊन सभागृहाकडून मला तशी संधी मिळेल अशी आशा वाटते.

## (अ) शैक्षणिक पुनर्रचनेची गरज व उद्दिष्टे

आज आपणासमोर देशांतर्गत व देशाबाहेरीलही प्रचंड आव्हाने उभी आहेत. महान त्यागाने व प्रयासाने मिळविलेले स्वातंत्र्य अधिक बलशाली व सुरक्षित ठेवण्यासाठी अत्यंत जागृत रहाण्याची आवश्यकता आहे. आर्थिक कोंडी फोडून शेती व उद्योग धंद्यांच्या आधुनिकीकरणाद्वारे आर्थिक विकासाला प्रचंड गति द्यावयाची आहे. गेल्या काही वर्षांत राजकीय व सामाजिक क्षेत्रांत राष्ट्रीय ऐक्याला बाध आणणाऱ्या विघटनकारी शक्तींनी डोके वर काढले असून त्यावर खंबीरपणे उपाय योजून प्रखर राष्ट्रभक्ती, मातृभूमीच्या सेवेसाठी समर्पणाची भावना, अखंड परिश्रम आणि शिस्तबद्ध जीवन यांच्या द्वारे नवनिर्मितीचे कार्य करण्याची गरज आहे. तसेच आधुनिक जगातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून आपले हक्काचे व मानाचे स्थान प्राप्त करून घेण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील असावयास हवे. शिवाय न्याय, समता, स्वातंत्र्य व व्यक्तिप्रतिष्ठा यांवर आधारलेल्या नवसमाज-निर्मितीचे आपले दीर्घकालीन स्वप्न साकार करण्याचा प्रयत्न तर अपरिहार्यच आहे. कारण याद्वारेच भारतीय जनतेच्या आशा आकांक्षा सफल होणार आहेत. ह्या आव्हानांचा यशस्वीपणे मुकाबला करावयाचा असेल व आपल्या आशा आकांक्षांची पूर्ति व्हावयाची असेल तर त्यासाठी एकच प्रभावी साधन उपलब्ध आहे आणि ते म्हणजे आपल्या जनतेचे शिक्षण.

सांस्कृतिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत राष्ट्राचा विकास भरीवपणे घडवून आणण्याचे, शिक्षण हेच प्रभावी व समर्थ साधन आहे आणि म्हणूनच त्याला राष्ट्रविकासाच्या कार्यक्रमात सर्वोच्च महत्त्व दिले पाहिजे हा विचार आता जगन्मान्य झाला आहे. त्यामुळेच कोठारी आयोगाने आपल्या अहवालात म्हटले आहे की, ‘शिक्षणसंस्थांच्या वर्गांमधून भारताचे भवितव्य आकार घेत आहे’. तेव्हा राष्ट्रीय उद्दिष्टे सफल करणारी शिक्षणपद्धती निर्माण करण्यासाठी मूलग्राही व व्यापक प्रयत्न होणे ही आजच्या काळाची गरज आहे. कारण त्यातूनच मानवी मूल्यांवर आधारलेल्या सुखी व समृद्ध अशा एकात्म भारताची महान प्रतिमा साकार होईल. यासाठी होणाऱ्या देशव्यापी प्रयत्नात महाराष्ट्राने केवळ सहभागी व्हावे एवढेच नव्हे तर आपल्या महान व प्रदीर्घ परंपरांना शोभून दिसेल असा सिंहाचा वाटा उचलला पाहिजे. प्रस्तुत श्वेतपत्रिका हे त्या दृष्टीने उचललेले पाऊल आहे एवढेच मी नम्रपणे सांगू इच्छितो.

अर्थात्, महाराष्ट्राच्या आजच्या विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात तर अशा प्रकारचे शैक्षणिक पुनर्रचनेचे कार्य हाती घेणे अपरिहार्य झाले आहे. कारण दुर्दैवाने पारतंत्र्याच्या काळात महाराष्ट्राची मुंबई राज्य, मध्यप्रदेश व हैद्राबाद अशा तीन वेगवेगळ्या प्रदेशांत विभागणी झाली होती. १९५६ मध्ये राज्यपुनर्रचनेनंतर जेव्हा हे तिन्ही विभाग एकत्र आले तेव्हा असे आढळून आले की, या तिन्ही विभागांत शैक्षणिक विकासाचा वेगवेगळा साचा निर्माण झालेला होता. एवढेच नव्हे तर शैक्षणिक विकासाची निरनिराळी पातळी त्यांनी गाठली होती. त्यामुळे या तिन्ही विभागांत शिक्षणाची एक समान पद्धती निर्माण करणे व शैक्षणिक विकासात समानता आणणे ही महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रातील अत्यावश्यक बाब झाली. राज्यपुनर्रचनेनंतर व विशेषतः महाराष्ट्र राज्य-निर्मितीनंतर याबाबत आपण बरीच मजल मारली आहे. १९६५–६६ व १९६६–६७ या वर्षांच्या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या अनुरोधाने महाराष्ट्रातील प्रचंड शैक्षणिक विस्तारासाठी व विभागीय असंतुलन दूर करण्यासाठी शासनाने केलेल्या प्रयत्नांचे संपूर्ण चित्र सदनाला मी सादर केले होते.

म्हणून आकडेवारी देऊन मी पुन्हा वेळ घेऊ इच्छित नाही. परंतु शैक्षणिक विस्ताराच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य भारतातील एक अग्रेसर राज्य म्हणून ओळखले जाते आणि ह्या विस्ताराचा वेग विदर्भ व मराठवाड्यात अधिक वाढविल्यामुळे असंतुलन दूर होण्याच्या दृष्टीने फार मदत झाली आहे एवढेच नमूद करू इच्छितो. असे असले तरी सर्व प्रकारचे असंतुलन दूर झाले आहे असे म्हणता येणार नाही. किंबहुना उर्वरित असंतुलन त्वरित दूर करणे अत्यावश्यक आहे.

राज्याच्या सर्व विभागांत एकसूत्रीकरणाच्या दृष्टीनेही काही अंशी प्रगती झाली आहे. प्राथमिक शिक्षणाचा समान अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके पुढच्या वर्षी पहिल्या इयत्तेपासून सुरू होत आहेत. 'महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळा'ची स्थापना होऊन समान परीक्षा पद्धती निर्माण करण्यात आली आहे. असे असले तरी माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणाच्या अभ्यासक्रमात व साच्यात एकसूत्रता निर्माण करण्यासाठी अनेक गोष्टी करावयाच्या आहेत.

महाराष्ट्रातील एकूण शिक्षण प्रसाराचा व शैक्षणिक विकासाचा विचार करता, माझ्या मते, आपण आता अशा टप्प्यावर आलो आहोत की, जेथून गेल्या १५–२० वर्षांतील घटनांचे सिंहावलोकन करून तसेच आगामी १५–२० वर्षांच्या विकासाचे चित्र दृष्टीपुढे उभे करून शिक्षणविषयक पुनर्रचनेची उद्दिष्टे निश्चित करणे आपणांस शक्य व्हावे. या संकल्पित पुनर्रचनेची पाच प्रमुख उद्दिष्टे असावीत असे शासनाला वाटते :—

(१) जनतेचे जीवन, गरजा व आकांक्षा यांच्याशी शिक्षणाचा घनिष्ट संबंध निर्माण करणे ;

(२) राज्याच्या विविध विभागांमध्येच नव्हे तर जिल्ह्याजिल्ह्यांमध्ये व विविध सामाजिक घटकांमध्ये शिक्षणविषयक संधींची समानता निर्माण करणे ;

(३) प्रत्येक बालकाला प्राथमिक शिक्षण मिळावे या हेतूने त्याचा मोफत व सार्वत्रिक प्रसार करणे. तसेच इयत्ता १ ते १० पर्यंतचे शिक्षण मोफत व सार्वत्रिक व्हावे असे अंतिम उद्दिष्ट नजरेसमोर ठेवणे ; आणि ज्या विद्यार्थ्यांना उच्च, माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षण हवे असेल त्यांना ते पात्रता व गरज या निकषावर उपलब्ध करून देणे ;

(४) शैक्षणिक गुणवत्तेची वाढ करणे व गुणवत्ता वर्धिष्णू ठेवण्याच्या दृष्टीने सतत प्रयत्नशील राहणे ;

(५) सर्व स्तरांतील गुणी व उत्कृष्ट विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांचा विकास करणे.

वरील पाच उद्दिष्टांचा श्वेतपत्रिकेमध्ये साकल्याने विचार केला आहे.

## (ब) पुनर्रचनेसंबंधीचे धोरण व कार्यक्रम

या संदर्भात मी फक्त पाच बाबींचाच ऊहापोह करणार आहे. त्या अशा :—

१. श्वेतपत्रिकेत मांडण्यात आलेल्या धोरणांचे सर्वसमावेशक व सुसूत्र स्वरूप ;

२. शिक्षणाचा आशय, अध्यापन पद्धती व परीक्षा पद्धती यांमध्ये करावयाचे मूलगामी बदल ;

३. शिक्षकांची पात्रता आणि शाळा व महाविद्यालये यांतील संकल्पित इयत्ताक्रम ;

४. शिक्षण संस्थांतील प्रवेश ; आणि

५. शैक्षणिक नियोजनाची विकेंद्रित व व्यापक पायावर आधारलेली पद्धती.

१. धोरणाचे सर्वसमावेशक व सुसूत्र स्वरूप.––शैक्षणिक धोरण व कार्यक्रम सर्वसमावेशक व सुसूत्र असावेत हे तत्त्व प्रामुख्याने सांभाळण्याचा प्रयत्न श्वेतपत्रिकेत केला आहे. म्हणजेच शिक्षणाच्या सर्व स्तरांचा व विभागांचा विचार त्यात आला आहे. अर्थात महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षणासंबंधी मांडलेल्या सूचना विद्यापीठांनी विचारात घेऊन त्यांची अंमलबजावणी करावी अशी अपेक्षा आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणविषयक प्रश्नांचा ऊहापोह विविध समित्या व आयोग यांच्याद्वारा केला गेला असला तरी त्यांनी विशिष्ट स्तरांचा किंवा समस्यांचा प्रासुख्याने विचार केलेला होता. तथापि, डॉ. डी. एस्. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या आयोगाने वरील प्रश्नांसंबंधी संकलितपणे व सुसूत्रपणे पाहणी करून तयार केलेल्या अहवालामुळे व त्यातील महत्त्वपूर्ण शिफारशींमुळे शैक्षणिक प्रश्नांसंबंधी मूलग्राही चिंतनाला चालना मिळाली. त्यामुळेच शिक्षण आयोगातील शिफारशींचा जसा या श्वेतपत्रिकेसाठी आम्ही पुरेपूर उपयोग करून घेतला आहे, तसाच आयोगाच्या अहवालावर गेली दोन वर्षे देशभर जी चर्चा झाली तिचाही आम्हांला उपयोग झाला आहे.

२. शिक्षणाचा आशय, अध्यापनाची पद्धती व परीक्षा पद्धती यांमध्ये करावयाचे मूलगामी बदल.––श्वेतपत्रिकेत ज्या धोरणांचा अवलंब करण्यात आला आहे, त्यात शिक्षणाचा आशय, अध्यापनाची पद्धती व मूल्यमापन पद्धती यांत बदल करून त्यांच्या द्वारा शिक्षण पद्धतीमध्ये परिवर्तन घडवून आणावे यावर सर्वांत अधिक भर देण्यात आलेला आहे. शिक्षण––मग ते कोणत्याही दर्जाचे वा प्रकारचे असो––हितावहच असते आणि त्यामुळे व्यक्तीच्या व राष्ट्राच्या विकासात व समृद्धीत भर पडत असते, ही भोळसर समजूत चुकीचीच नव्हे तर भयावहही आहे. शिक्षण हेही दुधारी शस्त्र आहे. जर शिक्षण योग्य प्रकारचे असेल तर त्यामुळे व्यक्तीमधील उपजत गुणांचा उत्कृष्ट विकास होतो आणि आत्मविकास व आत्मोन्नती या मार्गांवरील त्याची श्रद्धा दळावते. याउलट, जर शिक्षण अयोग्य पद्धतीचे असेल तर मुळात चांगली असणारी एखादी व्यक्तीही एक अवघड समस्या बनू शकते ; आणि अशा अयोग्य शिक्षण पद्धतीमुळेच राजकीय व सामाजिक समस्या निर्माण होत असतात ; आणि समृद्धी व विकास याऐवजी विघटन व विनाश या मार्गांवरून वाटचाल होऊ लागते.

आपल्याला जी नवी शिक्षण पद्धती निर्माण करावयाची आहे तिचे प्रमुख घटक पुढीलप्रमाणे आहेत :––

(१) विद्येसंबंधीची आवड विद्यार्थ्यांच्या मनांत निर्माण करणे, त्यांची जिज्ञासा जागृत करणे ; स्वयंशिक्षणाच्या सवयी रुजविणे ; स्वतंत्र विचार करण्याची, तारतम्य बुद्धीने निर्णय घेण्याची व समस्या सोडविण्याची पात्रता त्यांच्यात निर्माण करणे.

(२) सर्व विद्यार्थ्यांच्या शरीरसंवर्धनाकडे लक्ष पुरविणे ही दुसरी बाब आहे. शारीरिक शिक्षणाचा पुष्कळ अंशी चांगला कार्यक्रम सध्याही आपण कार्यान्वित केला आहे. तथापि, खेळ, क्रीडा व सैनिकी शिक्षण या क्षेत्रांत महाराष्ट्रात जे सुप्त वैभव आहे त्याचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठी अद्यापि पुष्कळच प्रयत्न करण्याची गरज आहे.

(३) कार्यानुभव व समाजसेवा या संबंधीच्या कार्यक्रमांवर जोर देणे ही तिसरी बाब आहे. श्रम व संस्कृती या परस्परपूरक बाबी आहेत आणि प्रत्येक व्यक्तीने कामही केले पाहिजे व संस्कृतीसंपन्नही बनले पाहिजे या नवमूल्यांच्या आधारे एकसंध समाजाची निर्मिती व्हावयास हवी. यासाठीच सामान्य जनतेला सर्वसाधारण शिक्षणाचा लाभ दिला पाहिजे या तत्त्वाचा स्वीकार यापूर्वीच आपण केला आहे. तथापि, जी उणीव आहे ती या तत्त्वाच्या उरलेल्या अंगाचा स्वीकार करण्याची. "जंटलमन" म्हणून संबोधल्या जाणाऱ्या बहुतांश मध्यमवर्गीय व उच्चवर्गीय मंडळींना "मळलेल्या हातांचे जीवनसंगीत" अद्यापि उमजलेले नाही. प्रत्येक नागरीकाने—मग तो कोणत्याही वर्गातील असो—समाजाला उपयोगी ठरणाऱ्या उत्पादक कार्यात या ना त्या प्रकारे भाग घेतलाच पाहिजे. या विचाराच्या अभावामुळे शैक्षणिक कार्यक्रमांमध्ये सध्या दुर्बलता निर्माण झाली आहे. त्यावर उपाय म्हणून कार्यानुभव व समाजसेवा हे शैक्षणिक कार्यक्रमांचे अविभाज्य अंग बनले पाहिजे. या कार्यक्रमांमुळे श्रमाधिष्ठीत कामाकडे व श्रम करणाऱ्या व्यक्तीकडे पहाण्याची योग्य व आदरयुक्त दृष्टी समाजात निर्माण होईल; बालक व युवक यांच्यात श्रमप्रतिष्ठेची भावना रुजविली जाईल आणि श्रमजीवी व बुद्धजीवी यांच्यात चालू शिक्षणपद्धतीमुळे जी भयावह दरी पडली आहे ती पुष्कळ अंशी बुजली जाईल. या कल्पना महात्मा गांधींनी आपल्या "जीवन-शिक्षण" पद्धतीद्वारे यापूर्वीच राष्ट्राला दिल्या, पण अद्याप त्यांचा सार्वत्रिक अवलंब झालेला नाही. आता या मूलभूत तत्त्वांचा आविष्कार शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर करावा असे योजिले आहे. अर्थात् केवळ कताई व विणाई यांच्याशी या तत्त्वांची गल्लत होऊ नये असे मुद्दाम नमूद करावेसे वाटते.

(४) विज्ञान-शिक्षण व वैज्ञानिक दृष्टिकोनांचे संवर्धन ही चौथी बाब आहे. आधुनिक जग हे विज्ञान व तंत्रज्ञान यावर प्रामुख्याने उभारले जात आहे. एखादे राष्ट्र प्रगत, समृद्ध व सामर्थ्यशाली होत आहे किंवा ते अप्रगत, दरिद्री व दुर्बल राहाणार आहे ही गोष्ट जर कशामुळे निर्णायकरीत्या ठरत असेल तर त्या राष्ट्रातील विज्ञान व तंत्रज्ञान यांचा विकास कोणत्या मर्यादेपर्यंत झाला आहे यावरूनच होय. आपल्या देशापुढील अनेक ज्वलंत समस्या सोडविण्यासंबंधी आपण अद्यापीही चाचपडत आहोत त्याचे एक प्रमुख कारण म्हणून विज्ञान व तंत्रज्ञान या शाखांमधील आपली तुटपुंजी प्रगती व झालेल्या प्रगतीचा सार्वत्रिक स्वीकार न होणे हे आहे. त्यामुळेच कृषि-औद्योगिक क्षेत्रातील क्रांतीची पाऊले वेगाने पडत नाहीत. यापुढे, विज्ञान व तंत्रज्ञान यांचा स्वीकार आपण मोठ्या प्रमाणावर केलाच पाहिजे. त्यामुळे भौतिक व सांस्कृतिक क्षेत्रात इष्ट परिवर्तन तर घडून येईलच, परंतु यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे अनिष्ट रूढी, घातुक परंपरा, सांप्रदायिकता, अंधश्रद्धा, दैववाद व निराधार भीती यावर स्वाभाविकपणेच प्रहार होतील. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होऊन सांस्कृतिक व सामाजिक जीवनाला नवा अर्थ प्राप्त होईल.

(५) कलात्मक संवेदना आणि नैतिक, सामाजिक व आध्यात्मिक मूल्यांची प्रतिष्ठापना करणे ही पाचवी बाब आहे. विज्ञानाच्या विकासाचे सध्याचे जे स्वरूप आहे त्यावरच

अतिरिक्त भर दिला गेला तर ललितकलांचा अभ्यास व नैतिक मूल्यांची जोपासना या बाबींकडे दुर्लक्ष होण्याचा धोका निर्माण होतो. या तऱ्हेचे असंतुलन दूर करण्याकडे लक्ष देण्याची गरज राहील. ललितकलांच्या व्यासंगामुळे व्यक्तिजीवनाला "मुक्त" अवस्थेची अनुभूती मिळू शकते, व्यक्तीच्या भावनांचे उन्नयन होण्यास मदत होते. त्या दृष्टीने ललितकलांचा योग्य प्रकारचा अभ्यास हा शैक्षणिक कार्यक्रमांचा अविभाज्य भाग बनविणे हितकारक ठरणार आहे.

त्याचप्रमाणे नैतिक व अध्यात्मिक मूल्यांच्या संवर्धनाकडे विशेष आस्थेने लक्ष देण्याची गरज आहे. विज्ञान व अध्यात्म यांच्यात मूलतः अंर्तविरोध आहे असे पुष्कळदा सुचविण्यात येते. परंतु वास्तविक त्या दोघांत एक अंतर्गत सुसंगतीच आहे. जोपर्यंत आत्मज्ञान व विज्ञान यांना जवळ आणण्यात आपण यशस्वी होत नाही, तसेच जोपर्यंत मानवाची निसर्गावर विजय मिळविण्याची आकांक्षा व त्याचा स्वतःवर विजय मिळविण्याचा प्रयत्न यांचा समन्वय आपण घालू शकत नाही तोपर्यंत मानवाच्या दृष्टीने हे जग सुरक्षित व सुखकारक होईल असे वाटत नाही.

३. शिक्षकांची पात्रता आणि शाळा व महाविद्यालये यांतील संकल्पित इयत्ताक्रम.—गेल्या वीस वर्षांच्या कालखंडात शिक्षणाच्या सोयींचा विस्तार करण्याच्या कार्यक्रमांवरच आपण प्रामुख्याने भर दिला आहे. कारण देश स्वतंत्र झाला त्यावेळी शैक्षणिक सोयींचा प्रसार अत्यंत बेताचा होता आणि दुसरीकडे समाजाच्या सर्वच थरांमध्ये शिक्षणासंबंधीची प्रचंड भूक निर्माण झाली होती. त्यामुळे, निर्माण झालेल्या विस्ताराच्या प्रचंड वेगामुळे शैक्षणिक गुणवत्तेच्या कार्यक्रमांना अनेकदा बाजूला सारावे लागले. तथापि, शैक्षणिक प्रयत्नांच्या दृष्टीने आता आपण अशा एका टप्प्यावर आलो आहोत की आपल्या आशाआकांक्षा पूर्ण होण्याच्या दृष्टीने शैक्षणिक उपक्रमांत यापुढे गुणवत्ता संवर्धनाकडे अग्रक्रमांकाने लक्ष द्यावयास हवे. अर्थात विस्ताराची रास्त मागणी पूर्ण करण्याकडेही दक्षतापूर्वक पहावेच लागेल.

शिक्षक.—गुणवत्तावृद्धीचे जे अनेक कार्यक्रम या श्वेतपत्रिकेमध्ये सांगण्यात आले आहेत त्यांतील सर्वांत महत्त्वाचा म्हणजे शिक्षकांचा दर्जा उंचावणे व त्यांच्यामध्ये व्यावसायिक प्रावीण्य निर्माण करणे. या दृष्टीने, शिक्षकांना मिळणारे शिक्षण, प्रशिक्षण व शिक्षक-कल्याण-योजना यामध्ये सुधारणा घडवून आणल्या पाहिजेत. इतर अनेक राज्यांपेक्षा महाराष्ट्रातील शिक्षकांना मिळणारे वेतन व इतर सवलती वरच्या दर्जाच्या आहेत. त्यांच्यासाठी शासनाने बरेच कार्य केले आहे. मी असे मानीत नाही की या संबंधात सर्व काही झाले आहे. परंतु जे काही झाले आहे त्या पार्श्वभूमीवर शिक्षकांकडून महाराष्ट्राच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत.

प्राथमिक शिक्षक.—प्रत्येक प्राथमिक शिक्षकाने माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले असले पाहिजे व त्यानंतर दोन वर्षांचे प्रशिक्षण पूर्ण केले असले पाहिजे अशी शिफारस सार्जंट यांच्या अहवालात १९४४ सालीच करण्यात आली होती. परंतु अद्यापही महाराष्ट्रातील पन्नास टक्क्यांहून अधिक प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत. त्यामुळे यापुढे प्राथमिक शिक्षकांची नेमणूक करताना माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण असणे

ही त्यांची किमान पात्रता ठरविण्याचा प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे अपुऱ्या पात्रतेचे जे शिक्षक नोकरीत आहेत त्यांना टपालद्वारा शिक्षणक्रम घेऊन किंवा खाजगी अभ्यास करून माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याच्या सवलती देण्यात येतील. राज्यातील प्राथमिक शिक्षकांमध्ये माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण नसलेल्यांची संख्या शक्य तितक्या लवकर कमी करण्यासंबंधी उपाय योजिले जातील. त्याचप्रमाणे, सर्व प्राथमिक शिक्षकांना दोन वर्षांचे अगर तत्सम दर्जाचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात यावे याबद्दलची व्यवस्था करण्यात येईल.

माध्यमिक शिक्षक.—माध्यमिक शिक्षकांना प्रशिक्षण देणारे निदान एक महाविद्यालय प्रत्येक जिल्ह्यात असावे या धोरणाचा स्वीकार शासनाने यापूर्वीच केला आहे व येत्या १/२ वर्षात हे उद्दिष्ट साध्य होईल अशी अपेक्षा आहे. तथापि, माध्यमिक स्तरावर जी प्रमुख अडचण भासत आहे ती शिक्षकांजवळ असलेल्या सर्वसामान्य शिक्षणाच्या अपुऱ्या तयारीसंबंधीची होय. राज्यातील माध्यमिक शिक्षकांपैकी निम्मे अधिक शिक्षक पदवीधर नाहीत. बिगर पदवीधर शिक्षकांना माध्यमिक शाळेत शिकविण्याची संमती फार काळ देणे हितावह नाही हे माननीय सभासदांनाही मान्य होईल. दुसरी एक गोष्ट तितकीच अयोग्य आहे ती अशी की, पदवीधर शिक्षकाला कोणताही विषय शिकविण्याची सध्या मोकळीक आहे. त्यामुळे बऱ्याचदा समाजशास्त्राचा पदवीधर विज्ञान शिकविताना दिसतो तर अर्थशास्त्राचा पदवीधर इंग्रजी किंवा संस्कृतही शिकविताना आढळतो. या परिस्थितीवर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने, माध्यमिक शाळेतील प्रत्येक शिक्षक हा प्रशिक्षित पदवीधर असला पाहिजे व ज्या विषयात त्याने पदवी घेतली असेल किंवा ज्या विषयाचे त्याला पुरेसे ज्ञान असेल तोच विषय त्याने शिकविला पाहिजे असा दंडक घालावा लागेल. ही महत्त्वाची सुधारणा अमलात येण्याकरिता अनेक उपाययोजनांचा निर्देश श्वेतपत्रिकेत करण्यात आला आहे.

कोणताही समाज त्याच्या शिक्षण पद्धतीपेक्षा अधिक गतिमान असू शकत नाही, त्याचप्रमाणे कोणतीही शिक्षण पद्धती शिक्षकांपेक्षा अधिक गतिमान असू शकत नाही. तेव्हा ही गोष्ट स्पष्ट आहे की, शिक्षक हे स्वतः गतिशील व प्रागतिक विचाराचे असले पाहिजेत. समाज जीवनाच्या अग्रभागी राहण्याची व समाजाच्या विकासासाठी हातभार लावण्याची जिद्द त्यांच्यात असली पाहिजे. या दृष्टीने ते स्वतः आजन्म विद्यार्थी राहिले पाहिजेत आणि आत्मविकासाचा व विद्यार्थीविकासाचा ध्यास त्यांना लागून राहिला पाहिजे. हे साध्य होण्यासाठी विविध स्तरांवर काम करणाऱ्या शिक्षकांकरिता "व्यवसायांतर्गत शिक्षणाचा" कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याचा विचार आहे.

शाळा-कॉलेजांतील इयत्ताक्रम.—गुणवत्तावृद्धीच्या कार्यक्रमापैकी आता फक्त एकाच बाबीकडे म्हणजे शाळा-कॉलेजांतील इयत्ताक्रमाच्या नव्या अनुबंधाकडे (Pattern) मी सदनाचे लक्ष वेधू इच्छितो. शाळा-कॉलेजांतील इयत्ताक्रमांचा एक समान साचा साऱ्या देशभर असावा या विषयाची तीव्र जाणीव सध्या निर्माण झालेली आहे. अर्थात याबद्दल कदाचित वेगळीही मते असू शकतील. परंतु निदान एकाच राज्यातील विविध भागांत इयत्ताक्रमांचा समान साचा असावा याविषयी तरी कोणाचा मतभेद असेल असे वाटत नाही.

राज्यातील निरनिराळ्या विभागांत शाळा-कॉलेजांतील इयत्ताक्रमांत विविधता चालू असणारे महाराष्ट्र हेच एकमेव राज्य आहे. विशिष्ट ऐतिहासिक परिस्थितीदेखील त्याला कारणीभूत झाली आहे. परंतु, यापुढे ही विविधता फार काळ चालू देणे हितावह नाही या जाणीवेतूनच जी महत्त्वाची सुधारणा तातडीने हाती घेणे आवश्यक झाली आहे ती म्हणजे, शिक्षण आयोगाने शिफारस केलेला १०+२+३ असा इयत्ताक्रमांचा अनुबंध किंवा साचा निर्माण करणे ही होय. त्याबरोबरच, राज्याच्या सर्व विभागांत शालेय शिक्षणाच्या पातळीवर अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके यांमध्ये एकसूत्रता निर्माण करणेदेखील अगत्याचे आहे. मला सांगायला आनंद वाटतो की, या संकल्पित सुधारणांना महाराष्ट्रातील विद्या क्षेत्रातील मंडळींचा सर्वसामान्यपणे पाठिंबा आहे व महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाने तर या सुधारणेची एकमताने शिफारस केली आहे.

४. शिक्षण संस्थांतील प्रवेश.—शिक्षण प्रसाराबाबतचे धोरण पुढीलप्रमाणे राहील :—

(१) राज्याच्या विविध विभागांतील असंतुलन नाहीसे करण्यासाठी जारीने प्रयत्न करणे. याकरिता जिल्हा हा घटक मानणे.

(२) सर्व मुलांना लवकरात लवकर सकस व उच्च दर्जाचे प्राथमिक शिक्षण मिळावे या कार्यक्रमाला अग्रक्रम देणे ; स्त्री शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी आणि मागासलेल्या वर्गांतील व आर्थिक दृष्टया दुर्बल गटातील मुलांना शिक्षणाची संधी प्राप्त व्हावी यासाठी खास प्रयत्न करणे ; विद्यार्थ्यांच्या गळतीला व नापास होण्याच्या प्रचंड प्रमाणाला आळा घालण्याकडे विशेष लक्ष पुरविणे.

(३) इयत्ता ८ ते १० मधील शिक्षणासाठी असलेल्या सोयी शक्यतो वाढविणे व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन (Counselling) देण्यासाठी तरतूद करणे.

(४) नव्या साच्यामधील इयत्ता १० वीनंतरच्या शिक्षणाचा पुढील तत्त्वांच्या आधारे विस्तार करणे :—

(अ) मनुष्यबळाच्या गरजा व व्यावसायिक संधी लक्षात घेऊन विविध प्रकारचे व्यावसायिक, तांत्रिक व औद्योगिक शिक्षण देण्यासाठी पूर्ण-वेळ अथवा अर्ध-वेळेचे शिक्षणक्रम आखणे.

(ब) सर्वसामान्य माध्यमिक शाळा व महाविद्यालये यांतून बाहेर पडणाऱ्या मानवी शक्तीसंबंधीच्या समाजाच्या गरजांचा अंदाज घेणे अतिशय अवघड असते. आपल्या देशातील सद्यःपरिस्थितीत तर हे प्रकर्षाने जाणवते. त्यामुळे उपलब्ध शिक्षक, पैसा व साधने यांच्यावरच शिक्षणाचा विस्तार अवलंबून राहणे अपरिहार्य असते. तथापि, सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या व आर्थिक दृष्टया निर्बल असणाऱ्या वर्गांतील मुलांना या स्तरावरील शिक्षण घेण्याची संधी अधिकाधिक प्रमाणात मिळावी यासंबंधी दक्षता बाळगणे.

(क) दहाव्या इयत्तेनंतर उच्च शिक्षणासाठी प्रवेश देताना विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता, आधीची प्रगती आणि सामाजिक न्याय या निकषांचा विचार करावा लागेल. तसेच पूर्ण-वेळ शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थेत प्रवेश न मिळू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी टपालद्वारा शिक्षण व अर्ध-वेळाचे शिक्षणक्रम यासंबंधीच्या सोयी वाढवाव्या लागतील.

५. शैक्षणिक नियोजनाची विकेंद्रित व व्यापक पायावर आधारलेली पद्धती. —शैक्षणिक पुनर्रचनेच्या सर्वंकष कार्यक्रमाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून नियोजनाची नवी पद्धती श्वेतपत्रिकेत सुचविण्यात येत आहे. सध्या ज्या पद्धतीने शैक्षणिक नियोजन केले जाते ती पद्धती, वरून खाली जाणारी आहे. केंद्र शासन व राज्य शासन यांच्या पातळीवरच नियोजनाचा कार्यक्रम बहुतांशी तयार करण्यात येतो. जिल्हा पातळीवर योजना तयार होत नाहीत आणि ज्या शिक्षण संस्थांकडून व कार्यकर्त्यांकडून योजनेची कार्यवाही व्हावयाची असते त्यांना ही योजना तयार करण्याच्या कामात सहभागी होता येत नाही. ही परिस्थिती यापुढे चालू देणे कोणत्याही दृष्टीने योग्य होणार नाही. योजनेची सुरुवात काही बाबतीत जशी वरून झाली पाहिजे तशीच इतर काही बाबतीत खालूनही झाली पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्रातील शैक्षणिक नियोजनामध्ये व्यापकता व विकेंद्रितता निर्माण करण्याची दृष्टी स्वीकारणे आवश्यक आहे. प्रत्येक शिक्षण संस्थेने आगामी विकासाची व त्याच्या कार्यवाहीची योजना तयार केली पाहिजे. तसेच शिक्षण विकासाच्या जिल्हावार योजना तयार झाल्या पाहिजेत आणि त्या सर्वांचा समावेश करणारी व त्यांत पूरक कार्यक्रमांची भर टाकणारी अशी राज्य पातळीवरील सर्वसमावेशक योजना तयार झाली पाहिजे. अर्थात् हा उपक्रम नव्याने सुरू करावयाचा असल्याने प्रारंभी त्याचे स्वरूप प्रायोगिक राहणे अपरिहार्य आहे.

## (क) अंमलबजावणीची पद्धती

ह्या श्वेतपत्रिकेतील कार्यक्रमांची अंमलबजावणी कशी होणार हे जाणून घेण्यास सन्माननीय सभासद उत्सुक असणे स्वाभाविक आहे.

प्रथम एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, शैक्षणिक पुनर्रचनेचे कार्य केवळ पैशावर अवलंबून नसते, तर समाजाच्या अनेक घटकांच्या सहकार्याने ते साकार होत असते. म्हणूनच या प्रचंड कार्यात महाराष्ट्रातील सर्व थरांतील जनतेची श्रमशक्ती व बुद्धीमत्ता यांचे पाठबळ मिळेल असे गृहित धरले आहे. आजपावेतोच्या शैक्षणिक प्रयत्नांमध्ये ही दृष्टी होतीच, परंतु यापुढे समाजाच्या उत्स्फूर्त पाठबळाचा उपयोग अधिक व्यापकपणे व योजनाबद्ध रीतीने करावा लागेल. शिक्षण संस्थेच्या सभोवतालचा सारा परिसर त्या शिक्षणसंस्थेतील कार्यक्रमांशी एकरूप होईल असे घडले पाहिजे. या संदर्भात, शिक्षणविभागाची यंत्रणा केवळ प्रशासनाचे कार्य करणारी न राहता शैक्षणिक कार्यक्रमाच्या प्रचंड परिवर्तनाची जबाबदारी पेलू शकणारी व त्यासंबंधी मार्गदर्शन करू शकणारी अशी कार्यक्षम व लोकाभिमुख बनवावी लागेल.

कार्यक्रमांच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने महाराष्ट्रातील शिक्षकांवर जी महत्त्वाची कामगिरी सोपविली जाणार आहे त्याचा मुद्दाम उल्लेख करू इच्छितो. शिक्षणाच्या वेगवेगळ्या स्तरांवर काम करणारे शिक्षक एकत्र आले व त्यांच्याद्वारे नियोजनाच्या प्रक्रियेला चालना मिळत राहिली तर अंमलबजावणीसंबंधी ते सहकार्याने काम करू शकतील. शिक्षकांच्या गुणवत्तेचा दर्जा वाढविण्यासंबंधीही ते कार्यक्रम आखू शकतील. म्हणून, समान स्तरावरील शिक्षणसंस्थांमध्ये सांघिक उपक्रमांसाठी सहकार्याचे व्यासपीठ निर्माण करणे, तसेच निरनिराळ्या स्तरांवरील म्हणजे

प्राथमिक, माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षणसंस्थांमध्ये दर्जा वाढावा म्हणून अशाच सांघिक उपक्रमांद्वारे अनुकूलता निर्माण करणे अत्यावश्यक ठरेल. हे प्रयत्न करण्याची दिशा 'शाळासमुहां' च्या नव्या कार्यक्रमामध्ये अभिप्रेत आहे.

श्वेतपत्रिकेत चित्रित केलेल्या पुनर्रचनेसाठी शासनाकडून व समाजाकडून सढळपणे पैसा उपलब्ध होण्याची गरज राहील. राज्यातील शिक्षणावरील खर्च प्रतिवर्षी वाढवीत नेणे अपरिहार्य ठरणार आहे. महाराष्ट्रातील जनतेला शिक्षणाचे महत्त्व पुरेपूर माहीत आहे. त्यामुळेच, नव्या योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जी अपेक्षा केली जाईल ती लोकांकडून पूर्ण होईल याविषयी माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. आर्थिक बळाची उपलब्धता लक्षात घेऊन कार्यक्रमांचा विस्तार करता येईल अगर अग्रक्रम ठरविता येतील. तसा दृष्टीकोन श्वेतपत्रिकेमध्येही स्वीकारलेला आपणास आढळेल.

## आवाहन

अध्यक्ष महाराज, महाराष्ट्रातील संकल्पित शिक्षणविषयक पुनर्रचनेचा व्यापक व सर्व समावेशक कार्यक्रम हाती घेण्याची गरज का निर्माण झाली आहे, त्या कार्यक्रमाची उद्दिष्टचे कोणती आहेत, त्यासाठी योजावयाच्या कार्यक्रमांचे धोरण व स्वरूप कसे आहे व अंमलबजावणीची पद्धती कशी राहणार आहे यासंबंधी मी येथवर सांगितले. हे कार्यक्रम तांतडीने हाती घेतले पाहिजेत यात कोणाचेही दुमत होणार नाही. तथापि आमूलाग्र परिवर्तनाचे हे कार्य महत्वाचे व दूरगामी परिणाम करणारे आणि अनेक धोरणविषयक प्रश्नांशी निगडीत असल्यामुळे त्याचा सर्व बाजूंनी विचार होणे व अचूक निर्णय घेतले जातील यासंबंधी दक्षता घेणे आवश्यक आहे. शिवाय प्रत्येक कुटुंबातील मुले कुठल्या ना कुठल्या शाळेत जात असल्यामुळे शिक्षण हा सर्वस्पर्शी व त्यामुळे सर्वांच्या आत्मीयतेचा विषय आहे. आज महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येपैकी पांचवा हिस्सा शाळा कॉलेजां-मधून शिकत आहे. त्यामुळेच श्वेतपत्रिकेमधील धोरणांना व कार्यक्रमांना निर्णयाचे स्वरूप प्राप्त होण्याआधी राज्यभर विविध गटांकडून विचारविनिमय व्हावा अशी कार्यपद्धती शासनातर्फे अवलंबिण्यात येत आहे. विद्यापीठे, जिल्हा परिषदा, शिक्षक संघटना, खाजगी शिक्षणसंस्थांचे व्यवस्थापक व शिक्षणात रस घेणारे नागरिक अशा विविध घटकांचा सल्ला या कार्यात उपयुक्त ठरेल. या सार्वत्रिक चर्चेमध्ये महाराष्ट्रातील व देशातील वृत्तपत्रेही संपूर्ण सहकार्य देतील अशी आशा आम्ही बाळगून आहो.

शैक्षणिक पुनर्रचनेसंबंधी केंद्रीय शिक्षण मंत्रालय व विशेषतः भारतसरकारचे शिक्षण सल्लागार श्री. जे. पी. नाईक यांच्याशी वेळोवेळी विचारविनिमय झाला. त्यामुळे ही श्वेतपत्रिका संकल्पित राष्ट्रीय विचारधारेशी सुसंवादी राहील अशी अपेक्षा आहे. अर्थात्, महाराष्ट्राच्या किंबहुना भारताच्याच शैक्षणिक इतिहासात अशा प्रकारची शैक्षणिक धोरणाची श्वेतपत्रिका तयार होण्याची ही पहिलीच वेळ असल्यामुळे त्यात परिपूर्णता आणण्याचा प्रयत्न करूनदेखील अपूर्णता राहिली असल्यास ते आमच्या उणीवांचे प्रतिबिंब मानावे लागेल.

अध्यक्ष महाराज, या निवेदनाचा समारोप करीत असताना, अमेरिकन शिक्षणतज्ज्ञांच्या एका पथकाने रशियातील शिक्षणव्यवस्थेची पहाणी केल्यानंतर जे उद्गार काढले त्यांचा उल्लेख करण्याचा मोह टाळणे मला कठीण आहे. हे अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ म्हणतात :—

> " आम्ही जेव्हा सोवियत रशियामध्ये पाऊल ठेवले तेव्हा आम्हाला असे सांगण्यात आले की, रशियात क्रांतीनंतर वर्गविहीन समाज निर्माण करण्यात आला असून त्या समाजात कोणालाही खास हक्क लाभू शकत नाहीत. परंतु तेथील मुक्कामात आम्ही जे पाहिले त्यावरून आमची खात्री झाली की, रशियाचा हा दावा सर्वस्वी फोल आहे. आम्हाला तेथे असा एक भला मोठा वर्ग आढळला की जो खास हक्क उपभोगीत आहे व ज्याच्यासाठी सारा उर्वरित समाज रात्रंदिवस काबाडकष्ट करीत आहे. आणि हा विशेषाधिकार प्राप्त झालेला भाग्यवान वर्ग म्हणजे रशियातील मुले ! "

या संकल्पित शैक्षणिक पुनर्रचनेच्या द्वारे महाराष्ट्रातील बालकांचा असाच एक खास हक्कदार वर्ग निर्माण करण्याचा प्रयत्न आपण करूया. या कार्यातील प्रमुख जबाबदारी शासनाची असेल; परंतु केवळ शासनाच्या आवाक्यातील हे कार्य नव्हे. समाजातील सर्व घटक—शिक्षक, पालक, शिक्षणसंस्थांचे चालक, समाजधुरीण व सर्व थरांतील नागरिक आणि शासन—यांनी यासाठी संघटितपणे कार्यास प्रारंभ करावा लागेल. अशा सांघिक व विधायक प्रयत्नांद्वारे हे परिवर्तनाचे कार्य सुरू झाले तर महाराष्ट्राच्या शिक्षणक्षेत्रात एका नव्या युगाची निर्मिती होईल. उमलत्या पिढीच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील यच्चयावत् नागरिक जास्तीत जास्त कष्ट व त्याग करताहेत व हे कष्ट अन् त्याग स्वयंस्फूर्त आहेत असे घडले तर असेच एखादे शिक्षणतज्ज्ञांचे पथक येथे आल्यास त्यांच्याही तोंडून सहजोद्गार बाहेर पडतील की—

> " या महाराष्ट्रात एक भला मोठा खास हक्कदार वर्ग आहे आणि त्या वर्गासाठी सारा समाज रात्रंदिवस काबाडकष्ट करीत आहे. आणि हा विशेषाधिकार प्राप्त झालेला भाग्यवान वर्ग म्हणजे महाराष्ट्रातील मुले ! "

अध्यक्ष महाराज, या निवेदनानंतर श्वेतपत्रिकेचा मसुदा सभागृहाला मी सादर करतो.

# श्वेतपत्रिका

(मसुदा)

महाराष्ट्र राज्याच्या पुढील १५--२० वर्षांच्या कालखंडात व नव्या चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या (१९६९--१९७४) विशेष संदर्भात हाती घ्यावयाच्या संकलित शैक्षणिक पुनर्रचनेचा आराखडा

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील संकल्पित शैक्षणिक पुनर्रचनेचा आराखडा या श्वेतपत्रिकेद्वारे जनतेच्या विचारार्थ सादर करताना मला फार आनंद होत आहे.

आपल्या राष्ट्रीय जीवनातील आजच्या कसोटीच्या क्षणी विकासाचे स्थान किती महत्त्वपूर्ण आहे हे विशेष आवर्जून सांगण्याची आवश्यकता नाही. आपल्या उज्ज्वल परंपरांना साजेशी व जगातील सर्वांत मोठ्या लोकशाहीप्रधान देशाला शोभतील अशी महान उद्दिष्टे आपल्या थोरथोर नेत्यांनी आपल्यासमोर ठेवली आहेत. न्याय, स्वातंत्र्य, समता व मानवी प्रतिष्ठा यांवर अधिष्ठित असणारा एकसंघ आणि लोकशाहीवर प्रखर निष्ठा ठेवणारा बलशाली समाज आपणांस निर्माण करावयाचा आहे. देशाच्या आर्थिक विकासाला सुयोग्य दिशेने गती देऊन दारिद्र्य व विषमता नष्ट करावयाची आहे आणि प्रत्येक नागरिकाला किमान राहणीमान उपलब्ध करून द्यावयाचे आहे. त्याचप्रमाणे जगातील ज्ञानभांडाराकडे याचकाच्याच वृत्तीने पाहणे त्याज्य मानून ज्ञानाच्या विविध शाखांतून नवनवीन ज्ञाननिर्मिती करावयाची आहे. एवढेच नव्हे तर ज्ञानाच्या जागतिक आदान-प्रदानाच्या प्रक्रियेत बरोबरीच्या नात्याने भाग घेऊन सर्व राष्ट्रांच्या समुदायात मानाचे स्थान प्राप्त करून घ्यावयाचे आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतानाच आपणांला सद्य: परिस्थितीमधील अनेक आव्हानांना यशस्वीपणे तोंड द्यावयाचे आहे. देशाचे स्वातंत्र्य व अखंडत्व यांचे प्राणपणाने रक्षण करावयाचे आहे. स्फोटक लोकसंख्या वाढीच्या व देशाला जर्जर करणाऱ्या अन्नधान्याच्या स्थितीच्या ज्वलंत प्रश्नांवर तोड काढावयाची आहे. फुटीरपणाच्या प्रवृत्तीने अलीकडे भयानक स्वरूप धारण केले असून त्यामुळे राजकीय आणि सामाजिक जीवनाला तडे जाण्याची भीती निर्माण झाली आहे. वस्तुत: आपल्या राष्ट्रीय जीवनात आज एकसमयावच्छेदे-करून निर्माण झालेली ही जबरदस्त आव्हाने देशाच्या इतिहासात अभूतपूर्व आहेत.

या सर्व आव्हानांवर मात करून आपल्या राष्ट्रीय आकांक्षांची पूर्ती करून घ्यावयाची असेल तर एकच प्रभावी उपाय आहे, तो म्हणजे आपल्या देशातील मानवी संपत्तीचा विकास करण्याकडे आपण त्वरेने व जास्तीत जास्त लक्ष देणे. कारण, देशाचे भवितव्य अखेरीस आपल्या नागरिकांची कार्यक्षमता, गुणवत्ता, कार्यनिष्ठा व चारित्र्य यांवरच अवलंबून राहणार आहे आणि असे नागरिक घडविण्याचे कार्य प्रामुख्याने शिक्षणाद्वारेच होऊ शकते.

दुर्दैवाने, आज प्रचलित असलेली शिक्षण पद्धती ही जबाबदारी पेलण्यास व आपल्या आशा-आकांक्षाची पूर्ती करण्यास असमर्थ ठरली आहे. पारंपारिक व सरंजामशाही समाजाच्या गरजा भागवू शकणाऱ्या या शिक्षण पद्धतीचे जोखड आता निर्धाराने झुगारून दिले पाहिजे. तिच्या जागी स्वतंत्र भारताच्या आकांक्षाची व सद्य: परिस्थितीतील गरजांशी अनुरूप होईल अशी नवी शिक्षण पद्धती साऱ्या भारतभर अमलात येण्याची गरज तीव्रतेने निर्माण झाली आहे. या शिक्षण पद्धतीद्वारे समाजाच्या सर्व थरांतील बालकांच्या व्यक्तित्व विकासासाठी समान व सुयोग्य संधी निर्माण

झाली पाहिजे आणि जेथे जेथे निसर्गदत्त सुप्त गुणांचा ठेवा असेल तेथे तेथे शिक्षणाचे किरण पोचून ते विकसित झाले पाहिजेत. सामाजिक व राष्ट्रीय एकतेचा महामंत्र सर्वत्र प्रभावीपणे घुमला पाहिजे, उत्पादनक्षमता वाढवून राष्ट्र समृद्ध झाले पाहिजे, विज्ञान व तंत्रज्ञानाचा स्वीकार व वापर होऊन देशाच्या आधुनिकीकरणाचा मार्ग सुगम केला पाहिजे आणि भारतीय संस्कृतीतील अक्षय मूल्यांची जोपासना करीत असतानाच अखिल विश्वातील नानाविध सांस्कृतिक मूल्ये यांविषयी प्रेमादराची भावना निर्माण केली पाहिजे.

अशा प्रकारच्या राष्ट्रीय शिक्षणप्रणालीच्या अंतर्गत महाराष्ट्राने आपल्या शैक्षणिक धोरणाची व पद्धतीची पुनर्रचना केली पाहिजे. अर्थात असे करीत असता महाराष्ट्राच्या विशिष्ट परंपरा, लोकजीवनातील खास गरजा यांच्याशी ती सुसंवादी असली पाहिजे. कारण तसे केले तरच आपल्या या प्राचीन व प्रियतम मायभूमीच्या सर्वांगीण प्रगतीच्या संकल्पसिद्धीला मोलाचा हातभार लावल्याचे श्रेय महाराष्ट्राला लाभू शकेल.

या संदर्भात महाराष्ट्राने स्वीकारावयाच्या आमूलाग्र शैक्षणिक परिवर्तनाची रूपरेषा या श्वेतपत्रिकेद्वारे मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अभिप्रेत शैक्षणिक वैशिष्टचे पुढीलप्रमाणे आहेत :—

१. महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रातील उदात्त व प्रेरणादायी परंपरांचे आणि वैशिष्टचांचे जतन करीत असतानाच त्यातील दुर्बलतेचे निराकरण करण्यासाठी ती निर्धाराने सज्ज राहील.

२. निरक्षरतेचे निर्मूलन करण्यासाठी आणि सर्व मुलामुलींना चांगले व परिणामकारक प्राथमिक शिक्षण शक्य तितक्या लवकर—इतर राज्यांच्या मानाने कितीतरी आधी—देण्यासाठी तिच्यात तरतूद आहे. त्याचबरोबर कालावधीने इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण निःशुल्क व सार्वत्रिक करण्याच्या दिशेने पावले टाकण्याचा इरादा आहे.

३. इयत्ता १० वी नंतरच्या शैक्षणिक विकासाचा मेळ मनुष्यबळाच्या गरजांशी किंवा उद्योगधंद्यातील उपलब्ध संधींशी घालण्यात येईल. तसेच, त्याची गती ठरविताना उपलब्ध शिक्षक, साधनसोयी व आर्थिक शक्यता विचारात घेतली जाईल.

४. शिक्षणाच्या आशयात क्रांतिकारी फेरबदल करून ते लोकांचे जीवन, गरजा व आकांक्षा यांच्याशी सुसंवादी ठेवण्यात येईल. देशप्रेम, आंतरराष्ट्रीय सामंजस्य, विज्ञानशिक्षण, चारित्र्यसंवर्धन, कार्यानुभव, सामाजिक व राष्ट्रीय सेवा, शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा या सर्वांना ते कटाक्षाने महत्त्व देईलच, परंतु ललितकलांच्या शिक्षणावरही त्यात यथायोग्य भर राहील.

५. शिक्षणाच्या सर्व स्तरांवर व सर्व अंगोपांगांत गुणवत्तेचा विकास करण्यावर ते भर देईल. त्या दृष्टीने अभ्यासक्रमांची फेरपाहणी, आधुनिक अध्यापन पद्धतींचा व मूल्यमापन पद्धतींचा स्वीकार, सुप्त प्रज्ञेचा शोध व विकास, युवककल्याण, आणि सर्वांत महत्त्वाचा ठरणारा कार्यक्रम म्हणजे विविध शैक्षणिक स्तरांवरील व शाखांतील शिक्षकांच्या गुणवत्तेचा व कार्यक्षमतेचा विकास साधण्याची उपाययोजना या पुनर्रचनेत हाती घेण्यात येईल. राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालयांसाठी १०+२+३ असा समान इयत्ताक्रम राज्यात सार्वत्रिक करण्याची त्यात तरतूद असेल.

६. यापुढे शैक्षणिक योजनांची आखणी व्यापक पायावर व सर्वसमावेशक पद्धतीने करण्यात यावी या तत्त्वाचा स्वीकार यात आहे. या पद्धतीमुळे शैक्षणिक संस्थेच्या स्तरापासूनच योजनांची जडणघडण व अंमलबजावणी होईल. तेच सूत्र शाळासमूह कार्यान्वित करताना प्रतीत होईल व जिल्हानिहाय योजनांची आखणी व कार्यवाही करण्यात जिल्हा परिषदा सहभागी होतील. राज्य पातळीवरील योजनेमध्ये वरील सर्वांचा समावेश असेल व त्यांना पूरक ठरणाऱ्या कार्यक्रमांचाही अंतर्भाव राज्यपातळीवरील योजनेत होईल.

७. योजना यशस्वीपणे कार्यान्वित होण्यासाठी जनतेचा सक्रीय पाठिंबा मिळविणे व या क्षेत्रात आवश्यक असलेले विद्याविषयक नेतृत्व देणे शिक्षण विभागाला शक्य व्हावे म्हणून त्याची आवश्यक ती पुनर्रचना करण्यात येईल.

शैक्षणिक पुनर्रचना हा उपक्रम महाराष्ट्राच्या महान व प्रदीर्घ शैक्षणिक परंपरांशी सुसंवाद राखणारा एक नवा व सखोल प्रयत्न असून स्थूलपणे शिक्षण आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने हाती घेण्यात आला आहे.

संकल्पित शैक्षणिक पुनर्रचनेसंबंधी लोकमत अजमावावे या हेतूने ही श्वेतपत्रिका प्रसिद्ध करण्यात येत आहे. सर्वांना याबाबत आपापली मते प्रकट करण्याची संधी दिल्यावर प्रत्यक्ष कृतीसाठी धोरण आणि कार्यक्रम निश्चित करण्याचा शासनाचा विचार आहे. त्याचप्रमाणे धोरणांच्या अनुषंगाने पुढील १५–२० वर्षांच्या कालखंडासाठी शैक्षणिक विकासाची दीर्घ मुदतीची दार्शनिक योजना (Perspective Plan) तयार करण्यात येईल आणि चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कालखंडाचा आराखडादेखील तयार करण्यात येईल. शिक्षण पद्धतीला वैधानिक आधार प्राप्त झाल्यास वर उल्लेखिलेल्या शैक्षणिक क्रांतीचे ती एक प्रभावी साधन बनेल.

वर दिलेल्या संकल्पित शैक्षणिक पुनर्रचनेच्या कार्यक्रमाची पूर्वतयारी करण्यासाठी १९६८–६९ हे वर्ष लागेल आणि त्यानंतर १९६९–७० या राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या जन्मशताब्दी वर्षापासून या कार्यक्रमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी जोमाने सुरुवात करता येईल.

**म. ध. चौधरी,**
शिक्षण मंत्री,
महाराष्ट्र राज्य.

सचिवालय, मुंबई ३२,
दिनांक ८ एप्रिल १९६८.

# अनुक्रमणिका


| | | परिच्छेद | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| | श्री. म. ध. चौधरी, शिक्षणमंत्री यांची प्रस्तावना | | |
| १ | **शिक्षणाची उद्दिष्टे** | १.१ ते १.५ | १ |
| २ | **गुणवत्तावृद्धीचे ठळक कार्यक्रम** | २.१ १२.४ | ३ |
| | शिक्षणाचा आशय | २.२ ते २.६ | ३ |
| | विद्यालयीन व महाविद्यालयीन इयत्ताक्रम | ३.१ ते ३.२ | ५ |
| | अभ्यासक्रमातील फेरबदल | ४.१ ते ४.७ | ६ |
| | अध्यापन व मूल्यमापन तंत्राची सुधारणा | ५.१ ते ५.३ | ७ |
| | पाठ्यपुस्तके व पुरवणी-वाचन साहित्य | ६.१ ते ६.४ | ८ |
| | साधनसामुग्रीची सुधारणा | ७.१ | ८ |
| | शिक्षक : शिक्षण व प्रतिष्ठा | ८.१ ते ८.१६ | ९ |
| | पर्यवेक्षणविषयक सुधारणा | ९.१ ते ९.७ | ११ |
| | साधनसामुग्रीचा व सोयींचा पुरेपूर उपयोग | १०.१ | १४ |
| | गुणविशेषांचा शोध आणि विकास | ११.१ | १४ |
| | युवक कल्याण योजना | १२.१ ते १२.४ | १४ |
| ३ | **शिक्षणविषयक सोयींची समान संधी** | १३.१ ते २१.२ | १५ |
| | पूर्वप्राथमिक शिक्षण | १४.१ | १५ |
| | प्राथमिक शिक्षण | १५.१ ते १५.९ | १५ |
| | माध्यमिक शिक्षण | १६.१ ते १६.५ | १६ |
| | शालेय पातळीवरील तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण | १७.१ ते १७.६ | १७ |
| | उच्च शिक्षण | १८.१ ते १८.७ | १९ |
| | विशिष्ट गटांचे शिक्षण | १९.१ ते १९.३ | २० |
| | प्रौढ शिक्षण | २०.१ | २१ |
| | शिक्षण व कामधंदा | २१.१ ते २१.२ | २१ |
| ४ | **प्रशासन व आर्थिक व्यवस्था** | २२.१ ते २४.१ | २२ |
| | प्रशासन | २२.१ ते २२.४ | २२ |
| | आर्थिक तरतूद | २३.१ | २३ |
| | शिक्षणविषयक कायदा | २४.१ | २४ |
| ५ | **आवाहन** | २५.१ | २४ |

# महाराष्ट्राचा शैक्षणिक विकास

## १. शिक्षणाची उद्दिष्टे

१.१. शिक्षणाची प्रधान उद्दिष्टे तीन असून ती परस्परावलंबी आहेत :

(१) शिक्षण ही एक विद्याविषयक उच्च साधना आहे. या साधनेमुळे मानवाला सत्य व उत्कृष्टता यांच्या सिद्धीसाठी चिकाटीने प्रयत्न करण्याची स्फूर्ती लाभते ;

(२) व्यक्तीमधील अत्युत्तम अंतस्थ शक्तीचे प्रकटन होण्यास ती साह्य करते आणि तिचे शरीर, बुद्धी, भावना, हस्तकौशल्य, कलात्मक संवेदना व जीवन-मूल्यांसंबंधीची योग्य जाणीव यांचा संभाव्य मर्यादेपर्यंत विकास करते ;

(३) लोकांचे जीवन आणि गरजा यांच्याशी शिक्षणाचा योग्य समन्वय केला तरच ते राष्ट्रीय विकासाचे शक्तिशाली साधन ठरते. अशा शिक्षणातून प्रत्येक व्यक्तीला जबाबदार व उपयुक्त नागरिकत्वाचे प्रशिक्षण लाभते. तिच्यात ते आवश्यक वृत्ती आणि मूल्यांचा विकास करते. तसेच, पाहिजे त्या प्रकारचे निपुण मनुष्यबळ निर्माण करून जीवनाची आव्हाने झेलण्यास व आकांक्षा साकार करण्यास ते राष्ट्राला समर्थ बनविते.

१.२. वर निर्देशिलेल्या पहिल्या दोन उद्दिष्टांवर सध्या देण्यात येणारा भर चालू ठेवणे अगत्याचे आहेच परंतु देशांतर्गत व देशाबाहेरील सद्यःपरिस्थितीत सामावलेल्या प्रचंड आव्हानांना सामोरे जाऊन त्यांवर मात करण्याच्या दृष्टीने तिसऱ्या उद्दिष्टावर अधिक भर देणे अत्यावश्यक आहे. आपल्या राष्ट्रीय आकांक्षांची परिपूर्ती होण्याच्या दृष्टीनेही हे इष्ट ठरणार आहे. नियोजनबद्ध विकासाद्वारे लोकांचे जीवनमान आपल्याला पुरेशा प्रमाणात उंचावयाचे आहे. त्यासाठी कृषीविषयक तंत्राचे आधुनिकीकरण व औद्योगी-करणाची वेगवान प्रगती केली पाहिजे. लोकशाही जीवनाला दृढता आणून महत्प्रयासाने मिळविलेल्या स्वातंत्र्याचे संरक्षण केले पाहिजे. सांस्कृतिक, आर्थिक व सामाजिक बाबतीत स्वाधीनतेचा पाठपुरावा आपल्याला करावयाचा आहे आणि न्याय, समता, स्वातंत्र्य व व्यक्तिप्रतिष्ठा यांवर आधारलेल्या नवसमाजाची निर्मिती करण्यासाठी आपला देश कटिबद्ध झालला आहे. या राष्ट्रीय उद्दिष्टपूर्तीसाठी जी शिक्षण पद्धती निर्माण करावयाची तिच्या-तून प्रत्येक नागरिकाला मातृभूमीवर नितांत प्रेम करण्याची स्फूर्ती लाभली पाहिजे. तिच्या विकासासाठी तो वचनबद्ध झाला पाहिजे. या शिक्षण पद्धतीने विज्ञानाच्या सखोल अध्ययनाचा समन्वय सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांशी घातला पाहिजे. तिचे सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे निसर्गावर मात करण्याची मानवाची आकांक्षा व मीपणावर विजय मिळविण्याची त्याची धडपड यांमध्ये समतोल साधला पाहिजे. निरक्षरतेचे निर्मूलन तिने

केले पाहिजे. दर्जेदार व त्या जोडीलाच प्रभावी प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करून सर्वसामान्य नागरिकाची शैक्षणिक पातळी सुधारली पाहिजे. देशाच्या तज्ज्ञ मनुष्यबळाच्या गरजा भागविण्यासाठी तिच्याद्वारे समाजाच्या सर्व थरांतून बौद्धिक नेतृत्व साकार झाले पाहिजे, कार्यक्षम ठरले पाहिजे. त्याबरोबरच बुद्धिजीवी वर्ग आणि श्रम-जीवी वर्ग यांच्यात परस्पर सेवेची व सौहार्दाची भावना रुजवून परस्पर जिव्हाळ्याच्या बंधनातून त्यांना एकत्रित ठेवले पाहिजे. या महान उद्दिष्टांना जीवनात साकार करण्याच्या उद्देशाने राष्ट्रपिता महात्मा गांधींनी त्यांच्या जीवनशिक्षणाची योजना देशासमोर मांडली. प्रथम ती प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर स्वीकारण्यात आली. यापुढे शिक्षणाच्या सर्व स्तरांवर तिची उद्दिष्टे प्रतीत होतील. देशापुढे सध्या हेच कार्य मुख्यत्त्वेकरून असल्याने महाराष्ट्र त्यात साहजिकच सहभागी होत आहे.

१.३. शिक्षणाच्या विकासामध्ये महाराष्ट्रीय जनतेने नेहमीच जागरूकतेने व सातत्याने भाग घेतला आहे. महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, विष्णुशास्त्री चिपळूण-कर, लोकमान्य टिळक, सुधारकाग्रणी आगरकर, भारतसेवक गोखले, महर्षि कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदी लोकोत्तर व तपस्वी पुरुषांनी निर्माण केलेल्या उज्ज्वल परंपरेला साक्ष ठेवून निष्ठावंत शिक्षक महाराष्ट्रात सतत पुढे येत राहिले आहेत. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील शिक्षणाचा राज्य शासनाद्वारे जो विकास चालू आहे त्याला पूरक होतील असे महत्त्वाचे प्रयत्न करण्यासाठी येथील स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी संस्था यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे आणि तिचे सातत्य राखले आहे. प्राथमिक शिक्षणप्रसार, शिक्षकांची प्रतिष्ठा व वेतनमान सुधारणे आणि आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजातील मुलांसाठी निःशुल्क शिक्षण देऊन शिक्षणाची समान संधी उपलब्ध करणे या बाबतीत महाराष्ट्राने उल्लेखनीय प्रगती केली आहे. अखिल भारतात महाराष्ट्र हा एक असा भाग्यवान प्रदेश आहे की जेथे उत्कृष्ट दर्जाच्या संस्थांचे प्रमाण बरेच आहे. त्यांच्या उदाहरणाने उत्कृष्टतेचा परिपोष अधिक विस्तृत प्रमाणांत करणे शक्य आहे. परंतु त्याचबरोबर महाराष्ट्रातील शिक्षण पद्धतीचे दोष नजरेआड करणे इष्ट ठरणार नाही. यांपैकी कित्येक दोष भारतातील इतर प्रदेशांतही आढळतात. उदाहरणार्थ जीवनमूल्ये, गरजा व आकांक्षा यांचा व शिक्षणाचा मेळ नसणे; विज्ञान व तंत्रज्ञान यांच्या विकासाकडे अपुरे लक्ष असणे; सर्वसामान्यपणे शिक्षणाची खालावलेली पातळी; आणि सामाजिक व नैतिक मूल्यांवर यथायोग्य भर न देणे. असे असले तरी काही दोष महाराष्ट्रातच आढळतात. शालेय व महाविद्यालयीन वर्गात समान आकृतिबंध राज्याच्या सर्व विभागांत अद्यापि निर्माण झालेला नाही. पश्चिम महाराष्ट्रात चालू असलेला ११ वर्षांचा शालेय अभ्यास-क्रम अपव्ययी आहे. प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर विद्यार्थी गळतीचे प्रमाण मोठे आहे व उच्च प्राथमिक शिक्षणाचा दर्जा बराच उंचावणे निकडीचे झाले आहे. इंग्रजीच्या शिक्षणाचा दर्जा सुधारणे आवश्यक आहे. विविध पातळ्यांवर काम करणाऱ्या शिक्षकांची एकंदर शैक्षणिक पात्रता व अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण या दोहोंची उंची वाढविण्याकडे तातडीने लक्ष द्यावे लागणार आहे. समाज जीवनातील चलनशीलतेचा अभाव व गति-हीनता अनेक क्षेत्रांत व्यक्तिविकासाला मारक ठरली आहे. राज्यामध्ये उपलब्ध असलेल्या शारीरिक शिक्षण, खेळ व क्रीडा या क्षेत्रातील गुणसंपत्तीचा विकास करण्याची फार मोठी

गरज आहे. त्याचप्रमाणे कला व हस्तव्यवसाय यांच्या विकासाकडे खास लक्ष देणेही अगत्याचे आहे.

१.४. वर दिलेल्या विविध कारणांमुळे महाराष्ट्रातील शिक्षण पद्धतीची पुनर्रचना करण्याचा नवा आणि जोरदार प्रयत्न हाती घेण्याचा निर्णय शासनाने केला आहे. या पुनर्रचनेची प्रधान उद्दिष्टे पुढीलप्रमाणे राहतील :

(१) प्रचलित शिक्षण पद्धतीचे परिवर्तन करून तिचा जनतेचे जीवन, गरजा व आकांक्षा यांच्याशी अधिक घनिष्ट संबंध प्रस्थापित करणे ;

(२) शिक्षणाची गुणवत्ता वाढवून तिच्या विकासाचे सातत्य राखणे ;

(३) विविध क्षेत्रांतील गुणवत्तेचा शोध घेणे व तिचा विकास करणे ;

(४) शिक्षणाची समान संधी अधिक प्रमाणात निर्माण करण्याच्या दृष्टीने शिक्षणाच्या सर्व स्तरांवर व सर्व शाखांतील सोयींमध्ये वाढ करणे.

१.५. वरील उद्दिष्टे सफल व्हावी या दृष्टीने हाती घ्यावयाच्या काही प्रमुख कार्यक्रमासंबंधीचे विवेचन या श्वेतपत्रिकेत केले आहे. या कार्यक्रमांच्या कार्यवाहीचा शासकीय व आर्थिक तपशील तयार होत असून त्याच्या आधारे साधारणतः येत्या पंधरा वर्षांच्या कालखंडाकरिता व त्याचप्रमाणे १९६९-७० ते १९७३-७४ च्या चतुर्थ पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीनेही शैक्षणिक विकासाचे दीर्घकालीन दर्शन घडविणारी (Perspective) योजना तयार करण्यात येईल.

## २. गुणवत्तावृद्धीचे ठळक कार्यक्रम

२.१. गेल्या वीस वर्षांत शिक्षण विस्ताराच्या कार्यक्रमांनी अग्रस्थान पटकावले असल्याने गुणवत्तावृद्धीच्या कार्यक्रमांकडे सर्वसाधारणपणे दुर्लक्ष झाले आहे. आगामी काळातही शिक्षण विस्ताराचे कार्यक्रम चालू ठेवावेच लागतील. परंतु यापुढे गुणवत्ता-वृद्धीचे कार्यक्रम सुसंघटित करून त्यांच्यावर यथायोग्य जोर देणे आणि त्यांना शैक्षणिक विकास योजनांचा गाभा मानणे या दुहेरी दृष्टिकोनातून प्रयत्नांची उभारणी केली पाहिजे.

**शिक्षणाचा आशय**

२.२. लोकांची जीवन पद्धती, गरजा व आकांक्षा यांच्याशी शिक्षणाचा घनिष्ट संबंध प्रस्थापित करणे शैक्षणिक पुनर्रचनेच्या संकल्पित कार्यक्रमांचा केंद्रबिंदू असेल.

२.३. <u>सर्वसामान्य तत्त्वे</u> : वरील हेतू साध्य करण्याच्या दृष्टीने सध्या प्रचलित असलेल्या अभ्यासक्रमात पुढील सर्वसामान्य तत्त्वांच्या आधारे फेरफार करण्याचे योजिले आहे :

(१) शिक्षणातून राष्ट्रीयत्वाची जाणीव खोलवर रुजावी व राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत व्हावी यासाठी अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर शैक्षणिक कार्यक्रम

असे आखावेत की त्यामुळे ज्या भारतीय संस्कृतीचा वारसा आपल्याला लाभला आहे तिचे यथायोग्य ज्ञान व प्रेम मुलांमध्ये वाढीस लागेल ; देशाच्या विविध भागांबद्दलचे त्यांचे ज्ञान, सामंजस्य व आदर वृद्धिंगत होईल ; देशाच्या भवितव्या-विषयी त्यांच्यामध्ये श्रद्धा व आत्मविश्वास निर्माण होईल. आंतरराष्ट्रीय सामंजस्याला उत्तेजन देणे व विश्वबंधुत्वाची भावना बळकट करणे यांसाठीदेखील शिक्षणाद्वारे झटले पाहिजे ; वरील हेतू साध्य होण्याच्या दृष्टीने सर्व विषयांच्या अध्यापनाला व विशेषेकरून इतिहास विषयाच्या अध्यापनाला नवे वळण दिले पाहिजे ;

(२) दहावी इयत्तेपर्यंतच्या शिक्षणात विज्ञान आणि गणित या विषयांचा समावेश अनिवार्य केला पाहिजे ;

(३) शीलसंवर्धनावर भर देऊन त्याबरोबरच ज्ञानोपासेना, समाजसवा व राष्ट्रविकास यांविषयी विद्यार्थ्यांमध्ये समर्पित वृत्ती निर्माण केली पाहिजे;

(४) कार्यानुभव आणि राष्ट्रसेवा अगर समाजसेवा यांचा कार्यक्रम शिक्षणाच्या सर्व स्तरांवर विकसित करावा. त्या दृष्टीने शाळा व समाज यांना परस्पर साह्य करण्याच्या कार्यक्रमातून एकमेकांच्या अधिक निकट आणावे ;

(५) शिक्षणाच्या सर्व स्तरांवर शारीरिक शिक्षण, खेळ, क्रीडा व युवक कल्याणाचा एक विस्तृत कार्यक्रम राबविण्याचा विशेष प्रयत्न व्हावा ;

(६) ललितकलांचे शिक्षण व छंदोपासना या बाबींकडे अधिक लक्ष पुर-विण्यात यावे.

२.४. भाषाविषयक धोरण : भाषाविषयक धोरणाची सूत्रे पुढीलप्रमाणे राहतील :

(अ) १ ते ४ इयत्तांमध्ये सर्वसाधारणपणे फक्त एकाच भाषेचा अभ्यास करावा लागेल. ही भाषा मुलांची मातृभाषा असेल आणि तीच शिक्षणाचे माध्यमही असेल ;

(ब) ५ ते ७ इयत्तांमध्ये आणखी एका भाषेचा म्हणजे हिंदी भाषेचा अभ्यास आवश्यक समजण्यात येईल. विद्यार्थ्यांकडून मागणी आल्यास वैकल्पिक भाषा म्हणून इंग्रजी भाषेच्या शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली जाईल ;

(क) इयत्ता ८ ते १० मध्ये, मातृभाषा अगर प्रादेशिक भाषा, हिंदी व इंग्रजी अशा तीन भाषांचा अभ्यास आवश्यक धरण्यात येईल ;

(ड) इयत्ता ११ व १२ मध्ये, फक्त दोन भाषांचे अध्ययन आवश्यक असेल ;

(ई) ज्या प्राथमिक व माध्यमिक शाळांतून मराठीव्यतिरिक्त अन्य भाषेतून शिक्षण दिले जात असेल त्या शाळांतून मराठी या प्रादेशिक भाषेचा अभ्यास करण्याची सोय करून दिली जाईल. अर्थातच तेथे मराठीचे अध्ययन वैकल्पिक राहील. शाळेतील किमान विद्यार्थीसंख्येसंबंधीच्या सरकारने घालून दिलेल्या अटींचा विचार करूनच ही सोय करण्याचा निर्णय घेण्यात येईल. या उलट जर

मराठी ही मातृभाषा नसणाऱ्या मुलांना मराठी माध्यमाच्या शाळेत शिकण्याची इच्छा असेल तर त्या शाळांतून त्यांची मातृभाषा वैकल्पिक किंवा जादा भाषा म्हणून शिकण्याची सोय त्यांच्यासाठी केली जाईल ;

(फ) प्रादेशिक भाषेचा विकास करून विद्यापीठीय शिक्षणाच्या स्तरावर सर्वसाधारण माध्यम म्हणून तिचा अंगीकार केला जाईल. मात्र भाषिक अल्प-संख्यांकांच्या हितरक्षणाची सर्वतोपरी तरतूद केली जाईल. ज्या नियुक्त शिक्षण-क्रमात भाषा विषयाचे अध्ययन हा भाग आवश्यक मानला असेल तर त्याखेरीज विद्यापीठीय शिक्षणात कोणत्याही भाषेचे अध्ययन सक्तीचे राहणार नाही. या-शिवाय भाषाप्रभुत्व वाढविण्याच्या दृष्टीने हिंदी, मराठी आणि इंग्रजीचा वैकल्पिक भाषा म्हणून अभ्यास करण्याची सोय सर्व महाविद्यालये आणि सर्व विद्यापीठे यांमध्ये जरूर केली जाईल ;

(ग) संस्कृतच्या अध्ययनाला उत्तेजन दिले जाईल आणि मातृभाषा अधिक संस्कृत, त्याचप्रमाणे हिंदी अधिक संस्कृत असे संयुक्त पाठ्यक्रम आखले जातील.

२.५. मराठी भाषेचा विकास : शिक्षणाच्या सर्व स्तरांवर माध्यम म्हणून मराठीचा वापर करता यावा यासाठी आणि विज्ञान व तंत्रज्ञान यांची ती यथायोग्य वाहक ठरावी या दृष्टीने, मराठी भाषेचा विकास करण्याचा सर्वतोपरी प्रयत्न होईल.

२.६. शिक्षणाच्या आशयामध्ये परिवर्तन घडवून आणण्यासाठी शैक्षणिक सुधारणांचा, परस्परांना पोषक व सहाय्यभूत ठरणारा संकलित कार्यक्रम हाती घेतला जाईल.

**विद्यालयीन व महाविद्यालयीन इयत्ताक्रम**

३.१. महाराष्ट्र राज्यातील शाळा व महाविद्यालये यांत दोन वेगवेगळे इयत्ताक्रम अस्तित्वात आहेत. पश्चिम महाराष्ट्रात ११+१+३ तर विदर्भात १०+१+३. मराठवाड्यात सध्या जी ११+१+३ अशी रचना आहे ती बालवर्ग रद्द केल्याने बदलाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाच्या संदर्भात आपोआपच १०+१+३ अशी होईल. महाराष्ट्र राज्याच्या वेगवेगळ्या भागांत विविध इयत्ताक्रम चालू आहेत. ही परिस्थिती बदलणे आणि राज्यातील सर्व विभागांत एकच समान इयत्ताक्रम शाळांत व महाविद्या-लयांत लागू करणे अत्यंत निकडीचे झाले आहे. म्हणून शिक्षण आयोगाने सुचविलेला १०+२+३ हा इयत्ताक्रम काळजीपूर्वक योजना बनवून शासनातर्फे आपल्या राज्यात टप्प्याटप्प्याने सरसकट लागू करण्यात येईल.

३.२. शालेय शिक्षणासाठी समान अभ्यासक्रम व समान पाठ्यपुस्तके यांवर आधारित असलेला दहा वर्षांचा शिक्षणाचा कार्यक्रम १९७२–७३ पर्यंत सर्वत्र अस्तित्वात यावा या दृष्टीने पावले उचलण्यात येतील. या पद्धतीमुळे दहाव्या इयत्तेच्या अखरीस विद्यार्थ्यांची जी तयारी होईल ती आज विदर्भात दहाव्या इयत्तेच्या शेवटी व पश्चिम महाराष्ट्रात अकराव्या इयत्तेच्या शेवटी होणाऱ्या तयारीच्या तोडीची असेल अशी अपेक्षा आहे. द्विवार्षिक उच्च माध्यमिक शिक्षणाचा अभ्यासक्रम १९७४–७५ साली पूर्णपणे चालू झालेला असेल. या नवीन इयत्ताक्रमानुसार निर्माण होणारा त्रिवार्षिक महाविद्यालयीन

शिक्षणक्रम १९७५–७६ साली सुरू होईल आणि त्यानुसार शिक्षण घेणाऱ्या पदवीधरांची पहिली तुकडी १९७७–७८ च्या अखेरीस बाहेर पडेल.

**अभ्यासक्रमातील फेरबदल**

४.१. शालेय अभ्यासक्रम : इयत्ताक्रमाची संकल्पित पुनर्रचना आणि त्याचप्रमाण वर विशद केलेली शैक्षणिक पुनर्रचनेची सर्वसामान्य तत्त्वे यांना अनुसरून विद्यालयीन व महाविद्यालयीन अशा दोन्ही पातळींवरील अभ्यासक्रमांचा संपूर्ण फेरविचार करावा लागेल. शिक्षण विभागाने इयत्ता १ ते ७ साठी आवश्यक असलेला नवा अभ्यासक्रम यापूर्वीच तयार केला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंतचा अभ्यासक्रम तयार करील.

४.२. १ ते ७ इयत्तांकरिता फक्त एकच समान अभ्यासक्रम असेल. शिक्षण आयोगाच्या शिफारशींनुसार 'सामान्य'(O)व 'प्रगत' (A) अशा दोन प्रकारचे अभ्यासक्रम ८ वी ते १० वी व त्याचप्रमाणे ११ वी व १२ वी या इयत्ता गटांसाठी आखण्यात येतील. प्रगत शिक्षणक्रमाच्या अध्यापनासाठी आवश्यक असलेल्या सोयीविषयी मानदंड ठरवून दिले जातील व या सोयी ज्या शाळांतून उपलब्ध असतील त्यांनाच त्याचे अध्यापन करण्याची परवानगी मिळेल. आपल्या निवडीच्या एक वा अनेक विषयांचा प्रगत अभ्यासक्रम शिकविण्याची सोय करण्याचे स्वातंत्र्य शाळांना मिळेल. दहावीची व बारावीची परीक्षा सामान्य व प्रगत अशा दोन्ही पातळींवर घेतली जाईल. सामान्य पातळीवरील अभ्यासक्रमातून आपल्या आवडीच्या एका किंवा अनेक विषयांत परीक्षा देण्याची मुभा विद्यार्थ्याला राहील. याशिवाय, चांगल्या शाळांना नवनवे शैक्षणिक प्रयोग स्वतंत्रपणे करण्यास उत्तेजन व साह्य दिले जाईल. या सर्व उपाययोजनांमुळे प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना आपल्या गुणविकासासाठी स्फूर्ती व प्रेरणा लाभेल आणि अभ्यासक्रमाच्या विकासाची प्रक्रियाही अधिक जोरदार बनेल अशी आशा आहे.

४.३. प्राथमिक शिक्षण (इयत्ता १ ते ७) : प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावर राज्यात सर्वत्र समान अभ्यासक्रम व समान पाठ्यपुस्तके नेमण्याचा कार्यक्रम तावडतोब हाती घेण्यात येईल. १९६८–६९ साली पहिल्या इयत्तेपासून या कार्यक्रमास सुरुवात होईल. १९६९–७० साली दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेचा या कार्यक्रमात समावेश होईल. १९७०–७१ साली चौथी-पाचवी व १९७१–७२ साली सहावी-सातवी इयत्ता यात सामील होतील.

४.४. माध्यमिक शिक्षण (इयत्ता ८ ते १०) : नवीन शिक्षणक्रम व तदनुसार तयार केलेली पाठ्यपुस्तके राज्यातील सर्व विभागांतील ८ व्या इयत्तेत १९७०–७१ मध्ये लावली जातील.* १९७१–७२ मध्ये नववी इयत्ता व १९७२–७३ मध्ये दहावी इयत्ता यांना हा उपक्रम लागू होईल.

४.५. उच्च माध्यमिक शिक्षण (इयत्ता ११ ते १२) : १९७३–७४ साली नवीन अभ्यासक्रम ११ वीला लागू होईल. पदवीपर्यंत शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांना किंवा निवडक

---

* या वर्गात जे विद्यार्थी असतील त्यांनी नव्या शिक्षणक्रमाऐवजी जुन्या शिक्षणक्रमानुसार सातवीपर्यंतचे शिक्षण पार पाडलेले असेल, म्हणून काही किरकोळ तडजोड अपरिहार्य ठरेल, पण त्यामुळे कोणताही अवघड प्रश्न निर्माण होईल असे वाटत नाही.

अशा माध्यमिक शाळांना पुढच्या दोन इयत्ता जोडल्या जातील. या दृष्टीने माध्यमिक शाळांचा दर्जा वाढविण्याचे काम १९७०–७१ पासून चालू होईल. मध्यंतरीच्या काळातील तरतूद म्हणून १२ वी इयत्ता उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना एक वर्ष पुढ घालण्यात येईल.

४.६. विद्यापीठीय शिक्षण : मुंबईव्यतिरिक्त अन्य सर्व विद्यापीठांतून तीन वर्षांचा पदवी अभ्यासक्रम यापूर्वीच चालू झाला आहे. मुंबई विद्यापीठासही ही पद्धत अवलंबविण्यासाठी विनंती केली जाईल.

४.७. शिक्षणक्रम सखोल आणि सुयोग्य बनविण्याची प्रक्रिया विद्यापीठीय पातळीवरही जारी होईल. या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून सध्याच्या माध्यमिक शालान्त परीक्षांचा (S. S. L. C.) किंवा (H. S. C.) दर्जा लक्षात घेऊन त्याप्रमाणे अभ्यासक्रमाला वळण लावण्याचा प्रयत्न होईल. हे काम करण्याची व विशेषत: शिक्षण आयोगाच्या शिफारशीनुसार सर्वसाधारण अभ्यासक्रम (पास त्याचप्रमाणे ऑनर्स) व विशेष अभ्यासक्रम (फक्त ऑनर्स) अशा दोन्ही प्रकारच्या पदव्यांसाठी तरतूद करणारे अभ्यासक्रम आखण्याची विद्यापीठांना विनंती केली जाईल. १९७४–७५ सालापर्यंत विद्यापीठीय अभ्यासक्रमात याहूनही महत्त्वपूर्ण बदल करण्याची पुन्हा एकदा गरज भासेल. कारण त्यावेळी राज्याच्या सर्व भागांत द्वादश वर्षीय शालेय शिक्षणक्रम कार्यान्वित झालेला असेल. त्यावेळी पदवी परीक्षेच्या अभ्यासक्रमात आजच्या माध्यमिक शालान्त परीक्षेनंतरच्या पाच वर्षांच्या अभ्यासक्रमाइतकी तयारी करून घेण्याची दृष्टी ठेवली जाईल व यामुळे अभ्यासक्रमाचा दर्जा तोपर्यंत बराच उंचावलेला असेल. यथाकाल पदव्युत्तर शिक्षणाचा अभ्यासक्रमही यानुसार बदलावा लागेल आणि त्याचाही दर्जा वाढवावा लागेल.

### अध्यापन आणि मूल्यमापन तंत्राची सुधारणा

५.१. अभ्यासक्रमातील सुधारणांबरोबरच आधुनिक अध्यापन तंत्रांचाही अवलंब करण्याकडे लक्ष पुरविले जाईल. सध्याचा घोकंपट्टीवरचा किंवा निष्क्रिय अभ्यासावरचा आणि माहितीचा साठा गोळा करण्यावरचा भर कमी केला पाहिजे. त्याऐवजी विद्यार्थ्यांमध्ये योग्य अभिरुची, वृत्ती, जीवनमूल्ये निर्माण करून त्यांची जिज्ञासा जागृत केली पाहिजे, ज्ञानोपासनेकडे त्यांना आकर्षित करून स्वयंशिक्षणाची सवय लावली पाहिजे. यासाठी प्रमेयांची उकल करण्याचे कौशल्य त्यांना देण्याकडे आणि स्वतंत्र विचारातून निर्णय घ्यावयास सहाय्यभूत होणारी आकलनशक्ती वाढविण्याकडे खास लक्ष पुरविण्यात येईल.

५.२. याबरोबरच परीक्षा पद्धतीमध्येही अनुरूप सुधारणा करण्यात येतील. या दिशेने हाती घ्यावयाच्या कार्यक्रमात विशेषकरून पुढील गोष्टींचा समावेश असेल :—

(अ) परीक्षांची संख्या कमी करणे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीची अचूक पारख करण्याचे साधन या दृष्टीने त्यांची सुधारणा करून त्यांची विश्वसनीयता व अचूकता वाढविणे ;

(ब) शिक्षणाच्या सर्व पातळीवर व सर्व विभागांत सुयोजित अंतर्गत-चाचणी पद्धतीचा सार्वत्रिक अवलंब करणे ; आणि

(क) विद्यार्थ्यांच्या प्रगतीची व्यवस्थित नोंद ठेवण्याची पद्धत सर्व शिक्षण संस्थांतून अमलात आणणे.

५.३. अशा प्रकारचे परीक्षा सुधारणेचे उपक्रम विद्यापीठीय पातळीवर जारी करण्याची जबाबदारी विद्यापीठांवर राहील. शालेय पातळीवरील उपक्रमांची जबाबदारी राज्य शिक्षणशास्त्र संस्था ( State Institute of Education ) आणि राज्य परीक्षा मंडळ ( State Bureau of Evaluation ) यांचेकडे देण्यात येईल. त्यांची अंमलबजावणी प्रशिक्षण संस्था, जिल्हानिहाय पर्यवेक्षण पथके आणि शाळासमूह यांच्याद्वारा करण्यात येईल.

**पाठ्यपुस्तके आणि पुरवणी-वाचन साहित्य**

६.१. पाठ्यपुस्तकांची फेरपाहणी आणि सुधारणा करण्यासाठी भरीव कार्यक्रम हाती घेतला जाईल. राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती आणि अभ्यासक्रम संशोधन मंडळ (State Bureau of Text–Book Production and Curriculum Research) या नावाची एक स्वायत्त यंत्रणा शासनाने यापूर्वीच निर्माण केली आहे. तिचा अधिक विस्तार व विकास करण्यात येईल. पाठ्यपुस्तकांचा दर्जा वाढविणे व शिक्षकांसाठी मार्गदर्शिका आणि तत्सम इतर साहित्य निर्माण करणे यावर प्रयत्न केंद्रित होतील.

६.२. विद्यापीठांच्या स्तरावर, त्यांच्या सल्ल्याने व सहकार्याने भारतीय भाषांना शिक्षणाचे माध्यम बनविण्यासाठी आवश्यक साहित्य तयार करण्याच्या कार्यक्रमाला अग्रस्थान देण्यात येईल.

६.३. या प्रयत्नासमवेतच सर्व विद्यार्थ्यांना पुस्तके उपलब्ध करून देण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. त्याद्वारा सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांतील विषयवार शाखा यांमधून पाठ्यपुस्तकांचे पुरेसे संग्रह उपलब्ध करून दिले जातील.

६.४. बालवाङ्मय निर्मितीचा कार्यक्रम हाती घेतला जाईल. शाळासमूहांनी चालविलेल्या मध्यवर्ती व फिरत्या वाचनालयांतून त्याचप्रमाणे शालेय ग्रंथालयांच्या योजनेतून सर्व प्राथमिक शाळांपर्यंत हे वाङ्मय पोचविले जाईल.

**साधनसामुग्रीची सुधारणा**

७.१. शिक्षण संस्थांतील भौतिक सोयी व सामुग्री सुधार याचा एक कार्यक्रम टप्प्याटप्प्याने आखून विशेषत: ग्रंथालये, प्रयोगशाळा व कार्यानुभवासाठी लागणारे साहित्य यामध्ये भर घालण्यात येईल. या कार्यात साह्य देण्याची खास जबाबदारी स्थानिक समाजावर राहील. प्रत्येक शिक्षण संस्थेमध्ये एक 'विकास निधी' स्थापन करण्याच्या दृष्टीने पावले टाकली जातील. या निधीमध्ये पुढील देणग्यांचा समावेश असेल : (अ) पालक किंवा

स्थानिक लोकांनी दिलेल्या वर्गण्या व देणग्या ; (ब) स्थानिक स्वराज्य संस्थेकडून मिळालेली मदत ; व (क) प्राथमिक शाळांव्यतिरिक्त इतर संस्थांतून राज्य शासनाच्या निर्देशनानुसार विद्यार्थ्यांकडून गोळा केलेला "सुधारणा निधी" सर्व संस्थांना समान अर्थबळ लाभावे या समाजीकरणाच्या तत्त्वावर "या विकास निधीला" शासकीय अनुदान मिळेल. या निधीत जमा होणाऱ्या रकमेचा उपयोग प्रत्येक शिक्षण संस्थेला उपलब्ध सोयींमध्ये सुधारणा करण्यासाठी अगर नव्या सोयी उपलब्ध करण्यासाठी करता येईल.

**शिक्षक : शिक्षण व प्रतिष्ठा**

८.१. शिक्षकांचे सर्वसामान्य शिक्षण, त्यांचे व्यावसायिक प्रशिक्षण आणि प्रतिष्ठा सुधारण्याच्या कार्यक्रमांना अग्रस्थान देण्यात येईल.

८.२. सर्वसामान्य व व्यावसायिक शिक्षण : एका खास समितीने राज्यातील शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या प्रश्नांचा नुकताच अभ्यास केला आहे. तिच्या शिफारशी शासनाने सर्वसाधारणपणे मान्य केल्या असून त्या अमलात आणण्यासाठी राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ (State Board of Teacher Education) स्थापन केले आहे.

८.३. प्राथमिक शिक्षण : प्राथमिक शाळेचा शिक्षक हा किमान माध्यमिक शालान्त परीक्षा अथवा दहावीनंतरची सार्वजनिक परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा, याशिवाय त्याला दोन वर्षांचे व्यावसायिक प्रशिक्षण मिळालेले असावे, ही शिक्षण आयोगाची शिफारस शासनाने स्वीकारली आहे. ज्या व्यक्तीने माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण केले असेल तिलाच प्राथमिक शिक्षकांच्या नेमणुकीसाठी पात्र समजण्यात येईल, असा निर्णय या आधीच घेतला गेला आहे. स्त्रिया व मागासलेल्या जाती यांसाठी राखून ठेवलेल्या जागांसाठी जेव्हा अशा व्यक्ती उपलब्ध नसतील तेव्हा प्राथमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना नोकरीत घेता येईल, पण नोकरीत कायम होण्यासाठी रुजू झाल्यापासून सहा वर्षांच्या आत त्यांनी माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण केली पाहिजे. आज जे नोकरीत आहेत अशा शिक्षकांची शैक्षणिक पात्रता वाढविण्यासाठी भरीव कार्यक्रम आखला जाईल. त्याचप्रमाणे टपालाद्वारे शिक्षण देण्याचा कार्यक्रम संघटित करून, खाजगीरीत्या अभ्यास करण्यास आणि शक्य होईल तेवढ्या लवकर माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण करण्यास शिक्षकांना उत्तेजन व सहाय्य दिले जाईल. सध्या नोकरीत असलेल्या व माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांपैकी बहुसंख्य शिक्षक सुधारित वेतनश्रेणीच्या प्रोत्साहनामुळे येत्या दहा वर्षांत माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण करण्यास झटतील अशी अपेक्षा आहे.

८.४. यापुढे फक्त प्रशिक्षित शिक्षकच नेमणुकीस पात्र ठरतील. प्रशिक्षित उमेदवार उपलब्ध नसल्याने वा अन्य योग्य कारणामुळे जर अप्रशिक्षित शिक्षक नेमण्यात आले तर पाच वर्षांच्या आत स्वतःच्या खर्चाने प्रशिक्षित होण्याचे बंधन त्यांच्यावर राहील. यासाठी सुलभ हप्त्यांनी फेडण्याचे बिनव्याजी कर्ज गरजू शिक्षकांना प्रशिक्षणासाठी उपलब्ध करून देण्याची योजना केली जाईल.

८.५. माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना सध्या एक वर्ष प्रशिक्षण घ्यावे लागते. १९६८–६९ पासून ते दोन वर्षांचे होईल. सध्या नोकरीत असणाऱ्या ज्या शिक्षकांनी एस्. एस्. सी. नंतर मिळणारे फक्त एक वर्षाचे शिक्षण पूर्ण केले आहे त्यांना खाजगीरीत्या अथवा टपालशिक्षण पद्धतीद्वारा तयारी करून प्रशिक्षणाची दुसऱ्या वर्षाची परीक्षा द्यावी लागेल.

८.६. नोकरी करता करता शिक्षण घेण्याची सेवांतर्गत शिक्षण योजनाही मोठ्या प्रमाणावर सर्व प्राथमिक शिक्षकांना उपलब्ध करून दिली जाईल. आणि अशा प्रकारचे शिक्षण देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक खास संस्था प्रस्थापित केली जाईल.

८.७. राज्य शिक्षण प्रशिक्षण मंडळातर्फे अध्यापनाशी संबंधित विविध विषयांच्या तसेच ज्ञान शाखेतील विषयांच्या उच्च पातळीवरील परीक्षा ठेवण्यात येतील. प्राथमिक शिक्षकांनी या परीक्षांना बसावे यासाठी योग्य प्रकारच्या प्रोत्साहन योजना कार्यान्वित करण्यात येतील.

८.८. जिल्हा हा नियोजनाचा प्रमुख घटक मानून संस्थांची जागा निश्चित केली जाईल. काटकसर आणि कार्यक्षमता साधण्याच्या दृष्टीने मोठ्या पटसंख्येच्या संस्था उभारण्याची दक्षता घेण्याचा प्रयत्न केला जाईल. प्रत्येकीत पटसंख्येची किमान मर्यादा १६०—२०० एवढी ठेवली जाईल.

८.९. <u>माध्यमिक शिक्षक</u> : विषयनिहाय एकूण किती माध्यमिक शिक्षकांची आपणांस जरूर आहे याचा अंदाज बांधून प्रत्येक विषयाला विशेषतः विज्ञान, गणित आणि इंग्रजी-साठी आवश्यक असणारी शिक्षकसंख्या मिळविण्यासाठी खास उपायांचा अवलंब केला जाईल. महाविद्यालयांत व विद्यापीठांत पदवीपूर्व पातळीवर निरनिराळ्या विषयांसाठी विद्यार्थी-संख्या नियोजनबद्धतेने ठरवून देणे किंवा त्या त्या विषयांसाठी शिष्यवृत्त्या ठेवणे अशा गोष्टींचा या कार्यक्रमात समावेश होईल.

८.१०. माध्यमिक शिक्षकाने पदवी परीक्षेसाठी जो विषय घेतला असेल (किंवा ज्या विषयात त्याने पदवीच्या दर्जाची दुसरी काही पात्रता संपादन केली असेल) आणि ज्या विषयाच्या अध्यापन पद्धतीचे प्रशिक्षण त्याने पूर्ण केले असेल तोच विषय त्याने शाळेत शिकवावा असा नियम केला जाईल. अपेक्षित पात्रतेचे शिक्षक जर उपलब्ध नसतील तर मात्र तात्पुरत्या कालमर्यादेसाठी वरील नियमातून सूट देण्यात येईल.

८.११. नियमांप्रमाणे ठरवून दिलेली पात्रता ज्या माध्यमिक शिक्षकांकडे नसेल त्यांना आवश्यक ते विषयज्ञान आणि व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी टपाली शिक्षण-क्रमांची व्यवस्था केली जाईल. विवक्षित वयोमर्यादेच्या आतील सर्व शिक्षकांना ठराविक मुदतीत हे शिक्षणक्रम पुरे करावे लागतील.

८.१२. "सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या" कार्यक्रमाचा भरीवपणे विकास करण्यात येईल.

८.१३. प्रत्येक जिल्ह्यात एक माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालय असेल. जिल्ह्यातील शालेय पर्यवेक्षण यंत्रणा व प्राथमिक व इतर शिक्षकांच्या प्रशिक्षण संस्था यांच्या साह्याने ते जिल्ह्यातील माध्यमिक शाळांसाठी विस्तार कार्यक्रम राबवील आणि त्यांच्याकरवी निकटवर्ती प्राथमिक शाळांनाही विस्तार कार्यक्रमाचा लाभ करून देईल.

८.१४. उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षक : महाविद्यालयीन कनिष्ठ अधिव्याख्यात्यासाठी अपेक्षित असलेल्या शैक्षणिक पात्रतेइतकीच पात्रता उच्च माध्यमिक शालेय स्तरावरील शिक्षकांमध्ये असावी लागेल. शिवाय माध्यमिक शिक्षकांना आवश्यक असलेले प्रशिक्षणही त्यांना घ्यावे लागेल. त्यांची वेतनश्रेणीसुद्धा कनिष्ठ अधिव्याख्यात्याच्या वेतनश्रेणीप्रमाणे असेल. उच्च माध्यमिक शिक्षणाचा जो नवीन कार्यक्रम १९७३-७४ साली कार्यान्वित व्हावयाचा आहे त्यासाठी सुपात्र शिक्षकांची उणीव भासू नये म्हणून ते उपलब्ध करण्यासाठी शक्य तितक्या लवकर पावले उचलली जातील.

८.१५. शिक्षक प्रशिक्षणाच्या गुणवत्तेची सुधारणा : शिक्षक प्रशिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी शिक्षण आयोगाने अनेक शिफारशी केल्या आहेत. त्यांमध्ये पुढील कार्यक्रमांचा समावेश होतो. विषयज्ञानाला उजाळा देणे, व्यावसायिक अध्ययनात चैतन्य आणणे, अध्यापन व मूल्यमापन यांच्या पद्धती सुधारणे, छात्र-शिक्षकांच्या प्रात्यक्षिक कार्याची पुनर्रचना करणे, प्रशिक्षणानुषंगी विशेष शिक्षणक्रम आणि कार्यक्रम विकसित करणे, शिक्षक-प्रशिक्षकांची पात्रता वाढविणे, प्रशिक्षण संस्थांतून अधिक सोयी व छात्र-शिक्षक कल्याण योजना उपलब्ध करून देणे. या राज्यातील परिस्थितीला अनुरूप असलेले फेरबदल करून वरील कार्यक्रम क्रमशः अमलात आणले जातील.

८.१६. वेतनश्रेणी : महाराष्ट्रातील विविध प्रकारच्या शिक्षकांच्या वेतनश्रेणी भारतातील तत्सम शिक्षकांच्या वेतनश्रेणींच्या मानाने बऱ्याच वरच्या दर्जाच्या आहेत. विद्यापीठे व महाविद्यालये यांमधील शिक्षकांना सुधारलेली वेतनश्रेणी अमलात आली आहे. शालेय पातळीवरही समान वेतनश्रेणीचे तत्त्व राज्य शासनाने स्वीकारले आहे. एकाच प्रकारात समाविष्ट असणाऱ्या शिक्षकांना ते वेगवेगळ्या प्रकारच्या व्यवस्थापनाखालील संस्थांत काम करीत असले तरी सारखेच वेतन मिळते. खाजगी प्राथमिक शाळेतील शिक्षक सोडले तर इतर सर्व शाळा शिक्षकांना निवृत्तिवेतनाची सोय आहे. शासनाने असेही जाहीर केले आहे— आणि असे धोरण अवलंबिणारे महाराष्ट्र हेच सर्व भारतात एकमेव राज्य आहे—की, प्राथमिक शिक्षकांच्या सर्व शिक्षणपात्र मुलांना सर्व पातळींवर विनामूल्य शिक्षण मिळेल. या मार्गांनी व अन्य उपायांनीही शिक्षकांची प्रतिष्ठा सुधारण्याचे प्रयत्न चालूच राहतील आणि त्यांना योग्य सोयी–सवलती मिळवून देण्यासाठी शासन सतत प्रयत्नशील राहील.

### पर्यवेक्षणविषयक सुधारणा

९.१. पर्यवेक्षणाचा दर्जा सुधारणे ही एक तितकीच महत्त्वाची निकड आहे. या दृष्टीने हाती घ्यावयाच्या कार्यक्रमाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे राहतील : (अ) शिक्षण विभागाबाहेरील लोकांच्या कार्यकौशल्याचा पर्यवेक्षणासाठी उपयोग करून घेणे, (ब) शिक्षकांच्या व्यावसायिक नेतृत्वाचा लाभ शिक्षण संस्थांना मिळवून देणे, (क) त्यांना पुरेशा

प्रमाणात विस्तार सेवा उपलब्ध करून देणे, आणि (ड) शिक्षक व शिक्षण संस्थांना प्रयोगशील व निर्मितीप्रवण होण्यास उत्तेजन मिळण्याच्या दृष्टीने पर्यवेक्षण यंत्रणा सर्वतोपरी लवचिक व गतिमान ठेवणे.

९.२. राज्य पातळीवरील यंत्रणा : 'राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ' (State Bureau of Text-Book Production and Curriculum Research) त्याचप्रमाणे 'राज्य शिक्षक प्रशिक्षण मंडळ' (State Board of Teacher Education) यांचा उल्लेख वर आलाच आहे. शासनाने नुकतेच 'राज्य माध्यमिक शिक्षण मंडळही' स्थापले आहे. माध्यमिक शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक ते व्यावसायिक नेतृत्व देणारी सर्वोच्च संघटना या दृष्टीने मंडळाचे कार्य विकसित होईल. 'राज्य व्यवसाय मार्गदर्शन संस्था' शिक्षण संचालनालयाचा एक विभाग म्हणून कार्य करील आणि व्यापार, उद्योगधंदे व प्रमुख व्यावसायिक संघटना यांच्याशी निकट संपर्क प्रस्थापित करील. शिक्षण आयोगाच्या शिफारशींनुसार 'राज्य मूल्यमापन संघटना' (State Evaluation Organisation) क्रमशः कार्यान्वित होईल. बाह्य परीक्षा पद्धती सुधारण्याकरिता त्याचप्रमाणे अंतर्गत परीक्षांची कार्यक्षम पद्धती निर्माण करण्याकरिता तिचे साह्य सर्व शाळांना लाभेल. दहावी व बारावीच्या सार्वजनिक परीक्षांव्यतिरिक्त खात्यातर्फे घेतल्या जाणाऱ्या इतर सर्व परीक्षांची व्यवस्था करण्याकरिता 'राज्य परीक्षा कार्यालयाची' (State Bureau of Examinations) निर्मिती झाली आहे. शिक्षक प्रशिक्षण मंडळाच्या सहकार्याने हे कार्यालय शिक्षकांसाठी घ्यावयाच्या सर्व परीक्षांची व्यवस्था पाहील. वर उल्लेखिलेल्या यंत्रणेकडे सोपविलेली शालेय गुणवत्ता विकासाची विशिष्ट कामे सोडून त्यासंबंधीची उरलेली सर्व कामे सांभाळण्याच्या दृष्टीने राज्य शिक्षणशास्त्र संस्थेचा (State Institute of Education) विकास करण्यात येईल. त्यानुसार, शैक्षणिक संशोधन, प्रशिक्षण संस्थेतील अध्यापकवर्गाचे व पर्यवेक्षकांचे सेवांतर्गत शिक्षण, विषयशिक्षकांच्या संघटनांना साह्य, शिक्षकांचे प्रशिक्षण, इंग्रजीच्या शिक्षकांचे प्रशिक्षण व दृकश्राव्य शिक्षण हे कार्यक्रम संस्थेकडे राहतील.

९.३. जिल्हानिहाय पर्यवेक्षण विभाग : प्रत्येक जिल्ह्यात माध्यमिक शाळांसाठी एक पर्यवेक्षण विभाग स्थापन करण्यात येईल. (प्राथमिक शाळांच्या पर्यवेक्षणाबाबतची काही कर्तव्ये पार पाडण्याचीदेखील त्याच्यामार्फत अनायासे सोय होऊ शकेल.) या विभागाची व्यवस्था प्रथम श्रेणीच्या एका अधिकाऱ्याकडे राहील व माध्यमिक शाळांसंबंधीच्या कामासाठी द्वितीय श्रेणीचे काही अधिकारी त्याच्या मदतीस देण्यात येतील. जिल्ह्यामध्ये दर ४० ते ५० माध्यमिक शाळांकरिता एक अधिकारी असावा या दृष्टीने प्रथम श्रेणीच्या व द्वितीय श्रेणीच्या अधिकाऱ्यांची मिळून एकूण संख्या निश्चित करण्यात येईल. या पर्यवेक्षण विभागांचे कार्य सर्वसामान्यपणे प्रादेशिक शिक्षण उप संचालक आणि राज्य पातळीवर विद्याविषयक सुधारणांसंबंधीचे कार्य करणाऱ्या (वरील परिच्छेदात निर्देशिलेल्या) विविध यंत्रणांच्या देखरेखीखाली चालेल, शिवाय, प्रत्येक जिल्ह्यात किमान एक माध्यमिक प्रशिक्षण महाविद्यालय असेल व त्याचे निकटचे सहकार्य हा विभाग आपल्या कार्यात घेईल.

९.४. माध्यमिक शाळांचे पर्यवेक्षण सुधारण्याच्या या उपक्रमांना आणखी दोन उपक्रमांचे पाठबळ लाभेल:—

(१) माध्यमिक शिक्षण मंडळाचे माध्यमिक शाळांबाबतचे अधिकार अधिक वाढवून दिले जातील. कोणत्याही नव्या माध्यमिक शाळेस मान्यता मिळण्यासाठी शिक्षणविषयक सर्व अटी पूर्ण केल्याचा दाखला मंडळाकडून मिळवावा लागेल. एकदा मिळालेली मान्यता चालू रहाणेही मंडळाच्या शिफारशीवर अवलंबून राहील.

(२) माध्यमिक शाळांसाठी पथक-पर्यवेक्षण (Panel Inspection) पद्धती अवलंबिली जाईल. संस्थेच्या विकासाची पातळी लक्षात घेऊन हे पर्यवेक्षण दर तीन ते पाच वर्षांनी करण्यात येईल. पथक-पर्यवेक्षणाच्या वेळी संस्थेच्या विशिष्ट विकास कार्यक्रमांचा काळजीपूर्वक विचार करून संस्थेला व त्याचप्रमाणे शिक्षण विभागालाही तिच्या भावी विकासाच्या संबंधात कोणते धोरण व कार्यक्रम स्वीकारावेत याविषयी सल्ला देण्यात येईल.

९.५. संस्थानिहाय योजनाः सध्याच्या पद्धतीतला एकसारखेपणा आणि साचेबंदपणा यासंबंधीचा आग्रह प्रगतीच्या मार्गात मोठीच अडचण निर्माण करतो. यावर उपाय म्हणून शिक्षण पद्धती पुरेशी लवचिक व गतिमान ठेवून प्रत्येक शिक्षण संस्थेला आणि शिक्षकाला आपापल्या वैशिष्टचानुसार विकास साधण्याकरिता साह्य दिले जाईल. प्रत्येक शाळा ही स्वतंत्र घटक मानण्यात येईल आणि तिला आपल्या विकासाचा कार्यक्रम आखण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी उत्तेजन व साह्य देण्यात येईल. नवे उपक्रम, प्रयोग व सृजनशील कार्य हाती घेणाऱ्या शिक्षकांना व शाळांना प्रोत्साहन देण्यात येईल. पथदर्शक व प्रायोगिक कार्य करणाऱ्या अगर प्रशंसनीय प्रगती दाखविणाऱ्या शाळांना नेहमीच्या आवर्ती अनुदानाव्यतिरिक्त काही विशेष अनुदान देण्यात येईल. ज्याप्रमाणे सृजनशील व प्रयोगशील शाळांना पुढे जाण्याचे स्वातंत्र्य दिले जाईल त्याचप्रमाणे मागे पडलेल्या ज्या संस्थांना सुरक्षिततेच्या भावनेची आवश्यकता भासेल त्यांना सुयोग्य आधार व मार्गदर्शन देण्यात येईल. या प्रवृत्तीमध्ये पूर्वी निर्देशिलेल्या विकास निधीमुळेही अधिक चैतन्य येईल.

९.६. शालासमूह: शिक्षण आयोगाने सुचविलेल्या शालासमूह पद्धतीचा अवलंब राज्यात सर्वत्र क्रमशः केला जाईल. यामुळे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांना परस्पर साह्य देता येईल व ते दोघांनाही उपकारक ठरेल. या कार्यक्रमाचा आरंभ १९६८–६९ साली काही निवडक जिल्ह्यांतून होईल व जेथे आवश्यक नेतृत्व व उत्साह आढळेल अशा काही चांगल्या शाळांना यात सहभागी करण्यात येईल. यातून जो अनुभव मिळेल त्याच्या आधारे इतर शाळांतून, इतर जिल्ह्यांतून आणि क्रमाक्रमाने राज्यात सर्वत्र ही योजना पाच वर्षांच्या अवधीत लागू करण्यात येईल.

९.७. जिल्हानिहाय विकास योजना: आपापल्या जिल्ह्यासाठी शैक्षणिक विकासाच्या योजना आखण्याच्या कामी जिल्हा परिषदांना उत्तेजन व साह्य देण्यात येईल. प्रशासन विकास नियोजन आणि पर्यवेक्षण या सर्वांसाठी हाच प्रमुख घटक मानण्यात येईल.

**साधनसामुग्रीचा व सोयींचा पुरेपूर उपयोग**

१०.१. शैक्षणिक गुणवत्तेच्या विकासाकरिता आणि शालेय दर्जा उंचावण्यासाठी उपलब्ध साधनसामुग्रीचा भरीव उपयोग करून घेणे अत्यावश्यक आहे. सध्याच्या शिक्षण व्यवस्थेतील आधीच कमी असलेल्या सोयीसवलतीसुद्धा पुरेपूर वापरल्या जात नाहीत हे लक्षात आणून देऊन शिक्षण आयोगाने असे सुचविले आहे की, या कमतरतेच्या परिस्थितीतही शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी काही गोष्टी करता येतील. उदाहरणार्थ, शालेय कामाचा दैनंदिन वेळ वाढविणे, वर्षातील प्रत्यक्ष कामाच्या दिवससंख्येत वाढ करणे, दीर्घ मुदतीच्या सुटयांचा चांगला उपयोग करणे, आणि शिक्षण क्षेत्रात सगळीकडेच सतत व भरपूर कष्ट करण्याचे वातावरण निर्माण करणे. या सूचनांचे परिशीलन करण्यासाठी आणि राज्यातील विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात त्या विनाविलंब कार्यवाहीत आणण्याचा कार्यक्रम सुचविण्यासाठी एक समिती नेमण्याचा संकल्प आहे.

**गुणविशेषांचा शोध आणि विकास**

११.१. गुणवत्ता विकासाच्या ज्या आणखी एका कार्यक्रमावर भर देण्याचा शासनाचा मानस आहे तो म्हणजे जीवनाच्या विविध क्षेत्रांतील सुप्त प्रज्ञेचा शोध घेणे. ग्रामीण विभागातील बुद्धिमान मुलांसाठी वसतिगृहात्मक खास शाळा उघडण्याची योजना यापूर्वीच कार्यान्वित झाली आहे. तिची कार्यक्षमता व व्याप अधिक वाढविण्यात येईल. त्याशिवाय खालील प्रमुख कार्यक्रम हाती घेण्यात येतील :—

(१) बुद्धिमान मुलांसाठी खास शाळा काढण्यास जिल्हा परिषदांना उत्तेजन देण्यात येईल ;

(२) विशेषत: उच्च प्राथमिक आणि माध्यमिक पातळीवर शिष्यवृत्त्यांची योजना अधिक व्यापक व परिणामकारक केली जाईल ;

(३) विशेष गुणसंपन्न मुलांसाठी प्रगत विद्याभ्यासाचे खास कार्यक्रम योजण्यास आणि त्यांच्याकडे वैयक्तिक लक्ष पुरविण्यास शिक्षण संस्थांना उत्तेजन व साह्य दिले जाईल ;

(४) गणित व विज्ञान या विषयांचे विशेष आकलन असणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्याचे व त्यांचा गुणविकास करण्याचे कार्यक्रम विद्यापीठांच्या साह्याने आखले जातील ;

(५) खेळ व क्रीडा क्षेत्राकडे आणि ललितकलेकडे विशेष आकर्षण असणाऱ्या मुलांचाही शोध व विकास करण्यासाठी खास योजना आखली जाईल.

**युवक कल्याण योजना**

१२.१. युवक कल्याण कार्यक्रमासाठी एक सर्वंकष योजना बनविण्याचा विचार आहे. तिच्यात माध्यमिक शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठे यांतील विद्यार्थ्यांचा मुख्यत्वेकरून समावेश होईल. त्याचप्रमाणे काही प्रमाणात शिक्षण संस्थाबाहेर असलेल्या युवकांना ती लागू होईल.

१२.२. माध्यमिक शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे यातील विद्यार्थ्यांसाठी आखावयाच्या कार्यक्रमात पुढील गोष्टी असतील : सुयोग्य मार्गदर्शनाची सोय, पाठ्यपुस्तकांची ग्रंथालये, शिष्यवृत्त्या, गुणवत्तेचा शोध व विकास, आणि प्रज्ञावान त्याचप्रमाणे अभ्यास अपुरे राहिलेल्या किंवा अभ्यासात मागे पडलेल्या मुलांकडे वैयक्तिक लक्ष, विविधता असलेल्या भरीव अभ्यासेतर कार्यक्रमाची सोय व त्यामध्ये खेळ-व्यायाम व समाजसेवेवर विशेष जोर, छंदोपासनेसाठी आणि शिकत असतानाच द्रव्यार्जन करण्यासाठी सोयी, सुट्यांचा पुरेपूर आणि विधायक उपयोग करण्यासाठी योग्य कार्यक्रम.

१२.३. शिक्षण संस्थांच्या बाहेर असणाऱ्या युवकांचा प्रश्न फार मोठा आहे. तथापि, तो सोडविण्याची सुरुवात म्हणून त्यांच्यासाठी पुढीलप्रमाणे काही निवडक कार्यक्रम आयोजित करण्यात येतील : व्यावसायिक पात्रता वाढविण्यासाठी अंशवेळ शिक्षणक्रम, खेळ व क्रीडा, छंद शिक्षण, राष्ट्रसेवा व समाजसेवा यांमध्ये सहभागी होण्याची संधी.

१२.४. वरील योजनेची अंमलबजावणी करताना तिच्या प्रारंभिक अवस्थेमध्ये सध्याच्याच युवक कल्याण विभागाची क्षमता वाढविण्यात येईल आणि त्यानंतर त्याचे रूपांतर युवक सेवा संचालनालयात करून जिल्हा पातळीवर त्याच्या कार्याला आवश्यक असणारा पुरेसा अधिकारी वर्ग नेमण्यात येईल.

## ३. शिक्षणविषयक सोयींची समान संधी

१३.१. गेल्या वीस वर्षांत शिक्षण प्रसाराचे कार्य भरीव झाले असले तरी शिक्षणाची समान संधी निर्माण करण्याच्या दृष्टीने राज्याला अजून बरीच मजल मारावयाची आहे. म्हणून गुणवत्तावाढीच्या कार्यक्रमांच्या बरोबरीनेच शैक्षणिक सोयीच्या विस्ताराचे कार्यही पुढे चालू ठेवावे लागेल.

**पूर्वप्राथमिक शिक्षण**

१४.१. ग्रामीण विभागात, शहरातील उपेक्षित लोकवस्तीमध्ये किंवा समाजाच्या मागास थरातील मुलांसाठी पूर्वप्राथमिक शाळा चालविण्यास खासगी संस्थांना उत्तेजन देण्यात येईल. या बाबतीतील राज्य शासनाची प्रत्यक्ष जबाबदारी पूर्वप्राथमिक शाळा व प्रशिक्षण संस्था यांचे पर्यवेक्षण आणि मार्गदर्शन करणे ही राहील.

**प्राथमिक शिक्षण**

१५.१. सर्व मुलांना चांगले व प्रभावी प्राथमिक शिक्षण देण्याचा कार्यक्रम शासनाने महत्त्वाचा मानला आहे. तथापि या क्षेत्रात आतापर्यंत खूपच वाटचाल महाराष्ट्राने केली असल्याने या कार्यक्रमातील सांख्यिक प्रगतीचा भाग सोपा ठरेल. म्हणून, यापुढील काळात जो भर द्यावयाचा तो मुख्यतः गुणवत्तावृद्धीच्या कार्यक्रमांवर.

१५.२. विस्ताराचे कार्यक्रम : प्रत्येक मुलाच्या घरापासून सहज चालत जाता येईल एवढ्या अंतरावर प्राथमिक शाळा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रत्येक जिल्ह्याची शैक्षणिक योजना आखण्यात येईल. या योजनेनुसार, चौथी पंचवार्षिक योजना पूर्ण होण्याआधीच प्राथमिक शिक्षणाची सार्वत्रिक सोय झालेली असेल.

१५.३. प्राथमिक शिक्षणाच्या विकासाच्या बाबतीत जिल्ह्याजिल्ह्यात जी विषमता असेल ती नाहीशी करण्याच्या दृष्टीने पावले टाकली जातील.

१५.४. गुणवत्ता विकासाचे कार्यक्रम : प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्ता विकासाचा प्रश्न मात्र काहीसा अधिक अवघड आहे. कारण या क्षेत्रात विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण मोठे असून इयत्ता ५ ते ७ मधील शिक्षणाचा दर्जा बराच खाली आहे. हा प्रश्न सोडविण्याच्या उपायांना अग्रक्रम दिला जाईल.

१५.५. विशेषतः पहिल्या इयत्तेमधील विद्यार्थ्यांच्या गळतीचे व नापासाचे प्रमाण कमी करण्यासाठी जोरदार मोहीम हाती घेण्यात येईल.

१५.६. इयत्ता ५ ते ७ चे वर्ग जेव्हा माध्यमिक शाळांना जोडले जातात तेव्हा त्यांना अधिक चांगले शिक्षक, अधिक चांगल्या सोयी आणि चांगले वातावरण लाभते. त्यामुळे त्यांच्यातील शिक्षणाचा दर्जा निश्चितच सुधारतो. म्हणून, शहरी त्याचप्रमाणे ग्रामीण भागात ५ ते ७ हे वर्ग शिक्षण विभागाने घालून दिलेल्या अटी सांभाळून, व त्यातील शिक्षण निःशुल्क ठेवून, माध्यमिक शाळांना जोडले तर त्यासाठी परवानगी देण्याचा विचार आहे. त्यासाठी योग्य प्रकारची अनुदानाची पद्धती निर्माण करण्यात येईल.

१५.७. उच्च प्राथमिक पातळीवर विषयवार अध्यापनाची पद्धत हळूहळू अवलंबिण्यात येईल.

१५.८. १ ते ७ इयत्तांपर्यंतचे सर्व वर्ग असणाऱ्या प्राथमिक शाळांमध्ये मुख्याध्यापक पदी प्रशिक्षित पदवीधर आणि इतर सर्व शिक्षक माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रशिक्षित झालेले असतील. या परिवर्तनाचा आरंभ मोठ्या शाळांपासून करून ते क्रमशः सर्वत्र घडवून आणले जाईल.

१५.९. कार्यानुभव व समाजसेवा यांचा समावेश सर्व शाळांच्या कार्यात करून 'जीवन शिक्षण शाळा' व 'बिगर-जीवनशिक्षण शाळा' हा भेद नाहीसा करण्यात येईल. शिवाय, सध्याप्रमाणे केवळ कताई व विणकामावरच विशेष भर न देता कृषिविद्या, भाजीपाल्याची लागवड किंवा खेड्यातील शेतावर काम करणे यांवर अधिक भर दिला जाईल.

**माध्यमिक शिक्षण**

१६.१. माध्यमिक शिक्षणाचा विकास करताना गुणवत्तावृद्धीच्या आणि उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षणाच्या व्यवसायीकरणावर भर दिला जाईल.

१६.२. माध्यमिक शिक्षण : गुणवत्तेचे रक्षण साधून या पातळीवरील (इयत्ता ८ ते १०) शैक्षणिक सोयींचा शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात विस्तार केला जाईल.

१६.३. माध्यमिक शाळांची वाढ सध्या अनियोजितपणे चालू असल्यामुळे शैक्षणिक सोयींची अतिव्याप्ती व आर्थिक अपव्यय होत आहे, आणि खर्चिक व अकार्यक्षम ठरणाऱ्या लहान शाळांची संख्या वाढत आहे. हे टाळण्यासाठी द्वितीय शैक्षणिक सर्वेक्षणाच्या आधारे

प्रत्येक जिल्ह्यातील माध्यमिक शाळा कोठे काढाव्यात याची एक सर्वसमावेशक योजना तयार करण्यात येईल. तिच्यातील निकषांना अनुसरून सुमारे ८,००० लोकवस्तीला व विद्यार्थ्यांच्या घरापासून ३–४ मैल अंतराच्या आत एक माध्यमिक शाळा उपलब्ध होईल. ही योजना आखताना आज अस्तित्वात असलेल्या काही शाळांचे एकत्रीकरण व पद्धतशीर स्थलांतरही करावे लागेल आणि नवीन शाळांची स्थल निश्चिती काळजीपूर्वक करावी लागेल.

१६.४. माध्यमिक शाळा स्थापण्यासाठी सुयोग्य अटी घालून त्या काटेकोरपणे पाळल्या जातील. नवी शाळा स्थापन करण्यापूर्वी शासनाची परवानगी घ्यावी लागेल आणि राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाकडून तपासणी झाल्यावर आणि सर्व अपेक्षित अटी पूर्ण झाल्याची शिफारस मंडळाने केल्यावरच शाळेला मान्यता देण्यात येईल.

१६.५. उच्च माध्यमिक शिक्षण : महाविद्यालयाला जोडलेले वर्ग किंवा माध्यमिक शाळांचे सर्वोच्च वर्ग अशा स्वरूपात उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय केली जाईल. माध्यमिक शाळांकडे उच्च माध्यमिक शिक्षणाची जबाबदारी सोपविताना मुख्यत्वेकरून दोन निकष लावले जातील. पहिला निकष गुणवत्तेचा. ज्यांच्यामध्ये विकासक्षमता आढळेल अशा चांगल्या शाळांनाच निवड करताना प्राधान्य दिले जाईल. दुसरा निकष म्हणजे शिक्षणाच्या समान संधीची पुरेशी सोय करण्याची गरज. सुमारे ४० हजारांच्या लोकवस्तीला व प्रत्येक ५–७ मैलांच्या परिसरासाठी महाविद्यालयात अगर शाळांत उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय झाली पाहिजे. शिक्षणाच्या या पातळीवर गुणवत्तेला सर्वाधिक महत्त्व असल्याने या संस्थांच्या मान्यतेसाठी कडक नियम असतील आणि ते काटेकोरपणे पाळले जातील.

**शालेय पातळीवरील तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षण**

१७.१. सामान्य शिक्षणक्रमाच्या कक्षेत शिक्षण चालू ठेवणाऱ्या त्याचप्रमाणे त्यातून बाहेर पदार्पण करणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने या प्रश्नाचा विचार होईल.

१७.२. सामान्य शिक्षणक्रमाच्या कक्षेत येणारे विद्यार्थी : सामान्य शिक्षणक्रमातील विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक व माध्यमिक पातळीवरील सामान्य शिक्षणक्रमाच्या सर्व शाळांतून कार्यानुभवाची तरतूद करण्याचा कार्यक्रम क्रमशः अमलात येईल. त्याच्यायोगे श्रमप्रतिष्ठेची जाणीव विद्यार्थ्यांत रुजविली जाईल आणि उत्पादनात वाढ करण्यासाठी आवश्यक असलेल्या वृत्तीचा त्यांच्यात परिपोष होईल. याशिवाय, इयत्ता ८ ते १० या वर्गांतून सामान्य शिक्षणाच्या बरोबरीने घेता येतील असे तांत्रिक शिक्षणाचे अभ्यासक्रम अशा प्रकारे उपलब्ध केले जातील की ते पूर्ण होताच विद्यार्थ्याला उद्योगधंद्याकडे वळण्यासाठी उमेदवारी शिक्षणक्रमात प्रवेश करता यावा. कृषि शिक्षणासाठीही याच धर्तीवर कार्यक्रम आखता येईल. उच्च माध्यमिक पातळीवर मात्र औद्योगिक क्षेत्राच्या सहकार्याने किंवा व्यावसायिक शिक्षणासाठी खास उभारलेल्या संस्थांमधून व्यावसायिक शिक्षण देण्याचे धोरण सामान्यपणे अवलंबिले जाईल.

१७.३. <u>सामान्य शिक्षणक्रमाच्या कक्षेतून गळणारे विद्यार्थी :</u> सामान्य शिक्षणक्रम पूर्ण करणाऱ्या किंवा त्यापूर्वीच वेगवेगळ्या इयत्तांतून शाळा सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रश्न अधिक महत्त्वाचा तसाच अवघडही आहे. ज्या महत्त्वाच्या टप्प्यांवर मुले शाळा सोडतात त्यांचे पुढील गट पडतात :—

(१) चौथी इयत्ता पूर्ण होण्यापूर्वी ;

(२) चौथी इयत्ता उत्तीर्ण पण सातवीपूर्वी ;

(३) सातवी इयत्ता उत्तीर्ण पण दहावीपूर्वी ;

(४) दहावी उत्तीर्ण होऊन शिक्षण सोडणारे.

१७.४. वरीलपैकी पहिल्या दोन गटांतील मुलांना व्यावसायिक शिक्षणाच्या रूपाने काही देणे जवळजवळ अशक्य आहे. येत्या काही वर्षांत प्राथमिक शिक्षण अधिक परिणामकारकतेने सार्वत्रिक झाले की हे दोन गट आपोआपच नाहीसे होतील. तथापि, संक्रमण काळातील योजना म्हणून, या गटातील विद्यार्थ्यांसाठी अंश वेळ सामान्य शिक्षण व त्याच्या जोडीला ज्या व्यवसायाची निवड त्यांनी केली असेल त्यात त्यांची कार्यक्षमता वाढविण्यास उपयुक्त ठरणारे ज्ञान देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

१७.५. खरा प्रश्न तिसऱ्या वर्गाचा म्हणजे प्राथमिक शाळेतील शिक्षणक्रम पूर्ण केल्यानंतर शाळा सोडणाऱ्यांचा आहे. तांत्रिक शिक्षण संस्थेतील (I. T. I. मधील) काही अभ्यासक्रम आणि काही थोड्या सरकारी नोकऱ्या एवढेच व्यवसायक्षेत्र आज त्यांना उपलब्ध आहे. तथेही माध्यमिक शालान्त परीक्षा उत्तीर्ण होणारे विद्यार्थी त्यांच्याशी तीव्र स्पर्धा करीत आहेत. त्यामुळे या गटातील युवकांना नेमके कोणते व्यावसायिक शिक्षण देणे उपयुक्त ठरेल हे अद्याप फारसे स्पष्ट होऊ शकलेले नाही. तथापि दोन प्रकारचे कार्यक्रम हाती घेण्याचे योजिले आहे :—

(अ) एक-दोन जिल्ह्यांतील नोकरीधंद्याच्या सधींचा नीट अभ्यास करण्यात येईल आणि त्या अनुरोधाने प्रशिक्षण वर्ग योजून या युवकांना त्यात सामील करून घेतले जाईल.

(ब) ज्या युवकांनी एखादा व्यवसाय आधीच पत्करला असेल त्यांना त्या-विषयी अधिक ज्ञान देण्याबरोबरच थोडेफार सामान्य शिक्षणही मिळावे म्हणून अंश वेळ शिक्षणक्रमाच काही पथदर्शक प्रकल्प (Pilot Projects) आखले जातील. वरील उपक्रमांद्वारे मिळणाऱ्या अनुभवावर यासंबंधीचे पुढील कार्यक्रम अवलंबून राहातील.

१७.६. येत्या काही वर्षांत, चौथ्या वर्गातील युवकांचे (म्हणजे दहावीचे शिक्षण संपविणाऱ्यांचे) प्रश्न सोडविण्यावर भर दिला जाईल. उच्च माध्यमिक पातळीवर व्यवसाय शिक्षणाची सोय करून ते बहुतांशाने अंतिम ठरविण्यात येईल. त्यामुळे माध्यमिक शिक्षणाच्या अखेरीस बहुसंख्य विद्यार्थी जीवनातील विविध क्षेत्रांत पदार्पण करू शकतील. निरनिराळ्या व्यावसायिक शिक्षणक्रमांची मुदत त्यांच्या उद्दिष्टांनुसार १ ते ३ वर्षे राहील. कृषी, उद्योगधंदे, व्यापारउदीम, वैद्यक, गृहव्यवस्था, कला, कारागिरी शिक्षण, कार्यालयीन कामे इत्यादी अनेक क्षेत्रांचा त्यात समावेश होईल. त्यांची योजना लवचिक ठेवण्यात

येऊन तिच्यात पूर्ण वेळ, अंश वेळ व टपाली शिक्षणक्रम त्याचप्रमाणे विविध प्रकारच्या संस्थांतर्गत अभ्यासक्रमांचा समावेश होईल. यापूर्वीच्या परिच्छेदात निर्देशिलेल्या अभ्यास प्रकल्पांमध्ये आणि पथदर्शक प्रकल्पांमध्येही या शिक्षण स्तराचा समावेश केला जाईल. या गटासाठी कोणत्या प्रकारचे अभ्यासक्रम ठेवावेत व प्रत्येक अभ्यासक्रमासाठी कोणत्या सोयी करणे आवश्यक ठरेल या प्रश्नांसंबंधी त्यांच्याद्वारा मार्गदर्शन लाभेल.

उच्च शिक्षण

१८.१. महाविद्यालयांच्या उभारणीचा कार्यक्रम ठरविण्यासाठी एक सविस्तर योजना केली जाईल व साधारणपणे प्रत्येक १५ ते २० मैलांच्या परिसरासाठी व २,००,००० लोकवस्तीसाठी एक महाविद्यालय असावे असे अंतिम उद्दिष्ट ठरविण्यात येईल. यत्या १५–२० वर्षांत उच्च शिक्षणाचा विस्तार कसा करावा यासाठी विद्यापीठांशी विचार-विनिमय करून दीर्घकालीन विकासाचे दर्शन देणारी योजना (Prospective Plan) बनविण्यात येईल.

१८.२. उपलब्ध साधनसोयी मर्यादित आहेत हे लक्षात घेता उच्च माध्यमिक, व विद्यापीठीय शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची पद्धती काळजीपूर्वक नियमित करावी लागेल. प्रवेश देताना विद्यार्थ्यांची नैसर्गिक बुद्धिमत्ता, त्यांनी त्या आधीच्या शिक्षणामध्ये मिळविलेले प्राविण्य व सामाजिक न्यायाची तत्त्वे या बाबींचा योग्य तो विचार केला जाईल. जे विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ इच्छितात परंतु ज्यांना पूर्ण-वेळाचा शिक्षणक्रम घेणे शक्य होणार नाही अशांसाठी टपाली शिक्षणक्रमाची व बाहेरून परीक्षेला बसण्याची सोय करण्याची विनंती विद्यापीठांना केली जाईल.

१८.३. महाविद्यालये व विद्यापीठे यांतील वेगवेगळ्या शिक्षणक्रमांचे नियोजन करावे लागेल. भौतिक शास्त्रे, गणित व भूगोल यांसारख काही विषय शिकावण्याची सध्याची सोय अपुरी असल्याने तिची वाढ करावी लागेल. शिक्षणाचा खर्च बेसुमार वाढू नये या दृष्टीने प्रत्येक महाविद्यालयाने किती शिक्षणक्रमांची सोय करावी यावर काही नियंत्रण घालावे लागेल. राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये किंवा एकाच विभागातील वेगवगळ्या महाविद्यालयांतर्फे उपलब्ध करावयाच्या शिक्षणक्रमांचेही संयोजन करण्याची आवश्यकता आहे. या सर्व प्रश्नांचा विचार करण्यासाठी आणि उच्च शिक्षणाच्या प्रसाराचा घनिष्ट संबंध सामाजिक गरजा व आकांक्षांशी राहावा, अतिव्याप्ती व पुनरावृत्ती होऊ नये, खर्चाचे प्रमाण योग्य मर्यादेत राहावे आणि शिक्षणाचा योग्य तो दर्जा राखला जावा, यासाठी विद्या-पीठांशी विचारविनिमय करून एखादी सुयोग्य यंत्रणा निर्माण करावी लागेल.

१८.४. सध्या अमलात असणारे वहुतेक सर्व "विद्यापीठ कायदे" योग्य प्रकारे दुरुस्त करून त्यात अद्यावतता आणण्याची गरज निर्माण झाली आहे. याबाबतीतील विद्यापीठांच्या सूचना मागविण्यात येतील व त्यानंतर यथायोग्य उपाययोजना करण्यात येईल.

१८.५. उच्च शिक्षण सुधारण्याची जबाबदारी मूलतः विद्यापीठांचीच आहे. या-संबंधात शिक्षण आयोगाने अनेक महत्वाच्या शिफारशी केल्या असून त्यातील बहुतेक १९६७ मध्ये भरलेल्या कुलगुरूंच्या परिषदेत मान्य झाल्या आहेत. त्यानुसार निर्माण होणार

कार्यक्रम विद्यापीठे हाती घेतील व ते हिरिरीने कार्यान्वित करतील अशी आशा आहे. पुढील काही कार्यक्रमांवर भर देणे आवश्यक आहे :—

(१) पदव्युत्तर शिक्षणाचा आणि संशोधनाचा कस व विस्तार वाढविणे ;

(२) काही निवडक महाविद्यालये अगर त्यांतील विशिष्ट विभाग यांचा विकास उत्कृष्टतेच्या उच्च पातळीपर्यंत नेणे ;

(३) विशेष कार्यक्षम महाविद्यालयांचा विकास करून त्यांचे स्वायत्त संस्थांमध्ये रूपांतर करणे ;

(४) राष्ट्रसेवा व समाजसेवेच्या कार्यक्रमांची उभारणी करणे ;

(५) खेळ व क्रीडाक्षेत्रांचा विकास करणे ;

(६) सर्व महाविद्यालये व विद्यापीठांतील निरनिराळे विभाग यांमधून पाठ्यपुस्तक ग्रंथालयांची पुरेशी सोय करणे ;

(७) विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व कल्याणकारी कार्यक्रमांची सोय करणे : शिक्षक व विद्यार्थी यांचा एकमेकांशी निकट सहवास येईल अशा कार्यक्रमांची आखणी करणे ;

(८) द्रव्यार्जन करून विद्यार्जन करण्याच्या सोयीसह काही विद्यार्थी-साहाय्यक योजना राबविणे ; आणि

(९) अंश वेळ शिक्षण व फावल्या वेळातील शिक्षण यासंबंधी सोयी निर्माण करणे.

वर निर्देश केलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांसाठी शासन योग्य ती मदत देण्याचा कसोशीने प्रयत्न करील.

१८.६. शिक्षण आयोग व कुलगुरूंची परिषद यांनी सुचविल्याप्रमाणे या वेगवेगळ्या शिफारशींचा विचार करून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि उच्च शिक्षणाच्या सुयोग्य विकासाची दिशा निश्चित करण्यासाठी प्रत्येक विद्यापीठात एक खास यंत्रणा उभारणे हितावह ठरेल. शालेय पातळीप्रमाणेच या पातळीवरही उपलब्ध साधनसामुग्रीचा पुरेपूर उपयोग करण्याकडे बारकाईने लक्ष द्यावे लागेल. त्याचप्रमाणे तुलनात्मक दृष्ट्या पाहाता ज्यामुळे आर्थिक वा अन्य स्वरूपाचा बोजा फारसा वाढणार नाही अशा परीक्षा सुधारणेसारख्या उपक्रमाकडे प्रथम लक्ष पुरविणे योग्य ठरेल.

१८.७. विद्यापीठांनी व महाविद्यालयांनी शालेय शिक्षणाच्या समस्यांमध्ये लक्ष घालावे आणि शिक्षणाचा दर्जा वाढविण्याच्या कामी माध्यमिक व प्राथमिक शाळांना प्रत्यक्ष मदत करावी अशी शिफारस शिक्षण आयोगाने केली आहे. या कामात राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये प्रयत्नशील राहतील असा शासनाला विश्वास आहे. त्या दृष्टीने आवश्यक त्या सोयी व साह्य शासनाकडून जरूर पुरविले जाईल.

**विशिष्ट गटांचे शिक्षण**

१९.१. सामाजिक न्यायाच्या दृष्टीने व मुख्यत: मुलींच्या शिक्षणाचा समाज-परिवर्तनाशी असलेला निकट संबंध लक्षात घेऊन त्यांच्या शिक्षणाकडे खास लक्ष पुरविले जाईल. शाळांमधून शिक्षिकांची नेमणूक करण्यास उत्तेजन दिले जाईल.

१९.२. त्याचबरोबर मागासलेल्या वर्गांतील व विशेषेकरून आदिवासी जमातीमधील मुलामुलींना शिक्षण देण्यावर खास भर दिला जाईल. राज्यातील वर्गीकृत आणि आदिवासी विभागांमध्ये शिक्षणविषयक सवलतींचा प्रसार करण्यासाठी आश्रमशाळा उघडण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेतला जाईल. आणि त्या ठिकाणी माध्यमिक शिक्षणासाठीही आश्रमशाळांची सोय करण्याच्या धोरणाचा शक्यतेनुसार पुरस्कार करण्यात येईल.

१९.३. उपलब्ध साधन सोयींच्या प्रमाणात बौद्धिक किंवा शारीरिक दृष्टचा अपंग असलेल्या मुलांच्या शिक्षणाकडे अधिक लक्ष पुरविले जाईल. सर्वसामान्य मुलांसाठी असणाऱ्या शाळांमधूनही अपंग मुलांच्या शिक्षणाच्या विकासाचे कार्यक्रम हाती घेतले जातील.

**प्रौढ शिक्षण**

२०.१. निरक्षरता निर्मूलनाच्या बाबतीत ग्रामशिक्षणासारखी मोहीम आयोजित करून महाराष्ट्र राज्याने बरीच मोठी प्रगती केली आहे. हे प्रयत्न यापुढे चालू राहतील इतकेच नव्हे तर त्यांना विशेष चालना देण्यात येईल. त्याचप्रमाणे साक्षरतेला व्यावहारिक उपयुक्ततेचे साधन बनविता यावे या दृष्टीने साक्षरतोत्तर वर्गाचा कार्यक्रम पूरक स्वरूपात आखण्यात येईल.

**शिक्षण व कामधंदा**

२१.१. प्रत्येक योजनेच्या काळात बेकारी वा अर्धबेकारीचे प्रमाण वाढत गेल्याचे आढळत आहे ; त्याचप्रमाणे शिक्षितांमधील बेकारीचे प्रमाणही वाढत आहे. त्याची कारणे अशी :—

(१) जननाचा वेग फार असल्याने कामधंदा मागणाऱ्यांच्या लोकसंख्येत बेसुमार वाढ होत आहे ;

(२) त्या मानाने आर्थिक प्रगतीचा वेग कमी असल्याने कामधंद्याची वाढ बरीच मर्यादित आहे ;

(३) मनुष्यबळासंबंधीच्या गरजा किंवा कामधंद्याची उपलब्ध संधी यांच्याशी विविध शिक्षण संस्थांमधून दर वर्षी बाहेर पडणाऱ्या विद्यार्थीसंख्येचा मेळ बसू शकलेला नाही. उदाहरणार्थ, काही प्रकारच्या कामात जितक्या संख्येने तरुण प्रशिक्षित होत आहेत त्या प्रमाणात त्यांना कामाची संधी उपलब्ध नाही. इतर काही क्षेत्रांच्या बाबतीत प्रशिक्षणाचा दर्जा कमी राखला गेल्यामुळे तरुणांना कामधंदा उपलब्ध होऊ शकत नाही. तसेच, गरजेपेक्षा अधिक संख्येने किंवा गरजेपेक्षा खालच्या दर्जाची माणस शिक्षणाद्वारे तयार होत असून अनेक कामांच्या क्षेत्रात तज्ज्ञ मनुष्यबळाचा तुटवडाही सध्या भासत आहे.

या समस्यवर तोडगा काढण्यासाठी एकाचवेळी तीन आघाड्यांवर उपाययोजना करावयास हवी : (अ) लोकसंख्येचे नियोजन, (ब) जलद आर्थिक विकास, (क) मनुष्यबळविषयक गरजांशी किंवा कामधंद्याच्या संधीशी शिक्षणाचा घनिष्ट संबंध प्रस्थापित करणे.

२१.२. वर सांगितलेली तिसरी आघाडी ही मुख्यत्वेकरून शिक्षणक्षेत्राची जबाबदारी मानावी लागेल. त्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाय योजण्यात येतील :—

(१) प्राथमिक शिक्षणाची नोकरी व्यवसायाशी प्रत्यक्षतः सांगड घालता येत नाही. या शिक्षणातून व्यक्तीच्या बौद्धिक विकासाचा व व्यवसायात्मक प्रगतीचा पाया मात्र घातला जातो. या दृष्टीने प्रत्येक मुलाचा जन्मसिद्ध हक्क म्हणून प्राथमिक शिक्षण उपलब्ध केले जाईल व ते परिणामकारक रीतीने सार्वत्रिक कसे होईल याकडे आद्यक्रमाने लक्ष केंद्रित केले जाईल.

(२) माध्यमिक स्तरावर (इयत्ता ८ ते १०) शिक्षणाचा विस्तार शक्य तितका वाढविला जाईल. सध्या ज्या पद्धतीने आर्थिक दृष्टचा निर्बल वर्गांना (E. B. C. धर्तीवर) शैक्षणिक सवलती देण्यात येतात, किंवा ज्या इतर सवलती त्यापूर्वी देण्यात आल्या आहेत, किंवा ज्या पद्धतीने त्यांच्यात वेळोवेळी बदल करण्यात येतील, त्या पद्धतीने माध्यमिक शिक्षण निःशुल्क करण्यात येईल.

(३) मनुष्यबळाच्या गरजा किंवा उपलब्ध व्यावसायिक संधी (यात स्वतःसाठी व्यवसाय निर्माण करण्याच्या शक्यतेवर भर देण्याचा व त्यासंबंधीचा विकास करण्याचा विचारही असेल) आणि शिक्षक, विविध साहित्य व आर्थिक शक्यता यांच्या उपलब्धतेचा काळजीपूर्वक विचार करून दहाव्या इयत्तेनंतरचे शिक्षण सुनियंत्रित केले जाईल.

(४) उद्योगविषयक, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी उद्योगधंदे, व्यापारउदीम व शेती या क्षेत्रांतील प्रमुख व्यक्तींचे सहकार्य घेऊन शिक्षण विभाग व विद्यापीठे पुढील कामे करतील :—(अ) शिक्षणक्रमाची आखणी, (ब) दर्जाची नियुक्ती व शिक्षण संस्थांना मान्यता, (क) शिक्षक व व्यवसाय क्षेत्रात प्रत्यक्ष काम करणारे कार्यकर्ते यांची एकमेकांशी अदलाबदल, (ड) उमेदवारीचे शिक्षणक्रम, प्रत्यक्ष कामाचा अनुभव या व इतर प्रशिक्षणविषयक सोयींची तरतूद.

(५) मनुष्यबळाविषयीच्या गरजांशी शिक्षणाची सांगड घालण्याच्या दृष्टीने वेळोवेळी योजना तयार करण्याच्या व त्या अमलात आणण्याच्या कामात साहृय करण्यासाठी 'मनुष्यबळ संशोधन विभागाची' स्थापना करून त्याचा गरजेप्रमाणे विकास करण्यात येईल.

## ४. प्रशासन आणि आर्थिक व्यवस्था

**प्रशासन**

२२.१. आतापर्यंत ज्याकडे दृष्टिक्षेप टाकला तो शिक्षणाच्या प्रसाराचा आणि सुधारणेचा सर्वव्यापी, अनेकांगी व अवघड कार्यक्रम यशस्वी रीत्या अमलात आणण्यासाठी राज्य शिक्षण विभागाची मोठ्या प्रमाणावर पुनर्रचना करावी लागेल व त्याची कार्यशक्ती वाढवावी लागेल.

२२.२. राज्य शिक्षण मंडळ : शासनाला शिक्षणासंबंधी सर्व बाबतीत सल्ला देण्यासाठी सचिवालयाच्या पातळीवर एक राज्य शिक्षण मंडळ निर्माण करण्यात येईल. हे मुख्यतः सल्लागार मंडळ असेल आणि त्याचे कामकाज सर्वसाधारणपणे केंद्रीय शिक्षण

सल्लागार मंडळाप्रमाणे (Central Advisory [illegible]) चालेल. याशिवाय शेती, वैद्यक, सार्वजनिक आरोग्य आणि [illegible] क्षेत्रांमध्ये चालू असलेल्या शैक्षणिक कार्यक्रमांचे सुसूत्रीकरण करण्यासाठी . . [illegible]गांच्या सचिवांची एक समिती स्थापन करण्यात येईल.

२२.३. शिक्षणविषयक धोरणांचे संयोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण संचालनालयाची कामाच्या दृष्टीने पुनर्रचना करण्यात येईल. ती संघ पद्धतीने कार्य करणारी परंतु एकजिनसी यंत्रणा राहावी अशी तरतूद या पुनर्रचनेत होईल. राज्याच्या शासकीय विभागातील शिक्षणप्रमुख आणि जिल्हा पातळीवरील यंत्रणा यांना आर्थिक व प्रशासकीय बाबतीत अधिक विस्तृतपणे अधिकार सोपविण्याचे धोरण अवलंबिण्यात येईल.

२२.४. जनतासंपर्क सुधारण्यासाठी खास प्रयत्न केले जातील. त्याचप्रमाणे शिक्षण विभागातही परस्पर विचारविनिमय सुलभ व्हावा याकडे लक्ष दिले जाईल. राज्य शिक्षण मंडळ, जिल्हा परिषदा, स्थानिक शिक्षण समित्या (या समित्या जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी स्थापल्या जातील) शिक्षक संघटना, पालक संघटना आणि शैक्षणिक संस्था चालविणाऱ्या खाजगी संघटना ही जनतेशी संबंध वाढविण्याची प्रमुख साधने आहेत. त्यांच्याद्वारे जनतासंपर्क परिणामकारक रीतीने ठेवण्यात येईल व दृढतर करण्यात येईल. सर्व पातळींवर काम करणाऱ्या शिक्षकांसाठी संयुक्त शिक्षण मंडळे स्थापण्यात येतील. नियोजन आणि शैक्षणिक सुधारणेच्या कार्यात शिक्षकांना सक्रियपणे सहभागी करण्यात येईल.

**आर्थिक तरतूद**

२३.१. जनतेला आवश्यक असणारे गुणवत्तासंपन्न शिक्षण सार्वत्रिकपणे उपलब्ध करून देणे ही गोष्ट कमी खर्चात होणे शक्य नाही. राष्ट्राचे संरक्षण, प्रगती व अस्तित्व यांचा आणि शिक्षणाचा निकट संबंध पोचतो हे लक्षात घेऊन त्या दृष्टीने राष्ट्राने सढळपणे शिक्षणात भांडवली गुंतवणूक करणे अत्यावश्यक मानले पाहिजे. पूर्वी निर्देशिल्याप्रमाणे शासन स्वत: होऊन शैक्षणिक विकासासाठी शक्यतेनुसार जास्तीत जास्त साधनसामुग्री पुरविण्याचा कसून प्रयत्न करील. त्याचबरोबर स्थानिक समाज, खाजगी संघटना आणि स्थानिक संस्था यांना योग्य आर्थिक जबाबदारी उचलण्यासाठी उद्युक्त करून त्यांच्याकडूनही सर्वतोपरी साह्य मिळविण्यासाठी शिकस्त केली जाईल. केंद्र सरकारही सढळ हाताने मदत करून महाराष्ट्रातील शिक्षण प्रयत्नात आपला वाटा उचलेल अशी आशा आहे. तथापि, या संदर्भात, राष्ट्रातील उपलब्ध साधनसामुग्री मर्यादित असून अशा निकडीच्या आणखी अनेक गरजा त्यांतून भागवावयाच्या आहेत हे लक्षात घेणे अगत्याचे आहे. त्यामुळे नजीकच्या भविष्यकाळात शिक्षणविकासाची व्यूहरचना (Strategy) पुढे दिलेल्या पाच सूत्रांच्या आधारे ठरविण्यात येईल: (१) स्थानिक समाज, खाजगी संघटना, राज्य शासन व केंद्रीय शासन अशा सर्व ठिकाणांहून जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळविणे, (२) पैशांच्या अगर साधनसामुग्रीच्या बळावर होणाऱ्या कार्यक्रमाऐवजी माणसाच्या कष्टाने पार पडणाऱ्या कार्यक्रमांना प्राधान्य देणे, (३) उपलब्ध साधनसोयींचा पुरेपूर उपयोग करून घेणे, (४) साधनसंपत्तीच्या अपव्ययाला आळा घालून तो अगदी कमी करणे, (५) संस्था चालविण्याचा दरडोई आवर्ती खर्च आणि इमारती व साधने यांवर होणारा खर्च यात काटकसर करणे.

**शिक्षणविषयक कायदा**

२४.१. शिक्षण आयोगाने विशद केलेल्या स्वरूपात एक व्यापक शिक्षणविषयक कायदा संमत करून घेऊन शैक्षणिक पुनर्रचनेच्या या प्रयत्नाला कायदेशीर स्वरूप देण्याचे योजिले आहे. या कायद्यान्वये इतर अनेक गोष्टींबरोबर प्रत्येक शिक्षण संस्थेची नोंदणी करणे सक्तीचे राहील. सध्याच्या शासकीय आदेशांची जागा या कायद्याचे अधिनियम घेतील. शिक्षणविषयक हस्तपुस्तिकेची ( Education Manual ) सुधारित आवृत्ती तयार करण्यात येईल.

## ५. आवाहन

२५.१. उत्कृष्ट शैक्षणिक विकास पुढील पाच बाबींवर अवलंबून असतो :—

(१) सम्यक् दृष्टी : शैक्षणिक विकासाची दीर्घ मुदतीची उद्दिष्टे कोणती यासंबंधी सुस्पष्ट व संगतवार कल्पना, त्याचप्रमाणे तर्कशुद्ध भूमिकेतून अग्रक्रमांचा निर्णय घेऊन अल्प मुदतीचे कार्यक्रम तयार करणे.

(२) प्रशिक्षित व निष्ठावान नेतृत्व : प्रत्येक पिढीतील गुणवान व कर्तबगार स्त्री-पुरुषांपैकी काही यथायोग्य प्रमाणात अध्यापन व्यवसायाकडे आकर्षित होतील व शिक्षणाद्वारे राष्ट्रीय विकास साधण्याकरिता समर्पित वृत्तीने शक्ती वेचण्याची त्यांना प्रेरणा लाभेल, अशी परिस्थिती समाजात निर्माण करणे.

(३) सहकार्य : सतत वाढत जाणाऱ्या व विकसनशील समाजाच्या शिक्षणासारखे प्रचंड कार्य यशस्वी करावयाचे झाल्यास त्यामध्ये गुंतलेल्या सर्व यंत्रणा व व्यक्तींनी सहकार्याने काम केल्याखेरीज भागणार नाही. यामध्ये केंद्रीय शासन, राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी संघटना, शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि शिक्षणात स्वारस्य असणारे नागरिक या सर्वांचा समावेश आवश्यक ठरतो.

(४) उत्पादन सहाय्यक भांडवली गुंतवणूक : शिक्षण म्हणजे भावी पिढीची सुदृढ घडण हे लक्षात घेता शिक्षणावर होणारा खर्च ही एक उत्पादन सहाय्यक व शहाणपणाने केलेली भांडवली गुंतवणूक ठरते; भावी पिढीला विकासाची उत्तम संधी मिळावी यासाठी राष्ट्राने सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत. आवश्यकता असल्यास काही सुखसोयींचा त्याग स्वागतार्ह मानला पाहिजे.

(५) चिकाटीचे व जोरदार प्रयत्न : शिक्षणाची फळे तावडतोब हाती येत नसतात. ती एक दीर्घकालीन तपस्या असते. म्हणून शिक्षक, शिक्षण संस्था व शासन यांनी शक्य तितक्या सुबुद्धपणे शैक्षणिक पुनर्रचनेचे कार्यक्रम आखून त्यांच्यासाठी प्रदीर्घ काळपर्यंत सातत्याने व जिद्दीने कार्य करण्याची तयारी ठेवली पाहिजे. तरच हा शिक्षणवृक्ष रुजेल, वाढेल, बहरेल आणि फलदायी होईल.

या श्वेतपत्रिकेद्वारे महाराष्ट्र शासन महाराष्ट्राच्या शैक्षणिक पुनर्रचनेसाठी एक नवा आणि जोरदार प्रयत्न सुरू करीत आहे व शिक्षणाशी संबंधित अशा सर्वांनी या कामात हार्दिक सहकार्य द्यावे असे आवाहन करीत आहे. सर्वांनी एक दिलाने काम केले तरच विकासाचा वेग वाढेल व त्याची उभारणी भक्कम आणि सुस्थिर पायावर होईल. विकासाकडे वाटचाल करण्याचा याखेरीज अन्य मार्ग नाही.